# माणूस

शनिवार

२६ सप्टेंबर १९७०

चाळीस पैसे



" वत्सा, तू जिंकलास, मी हरलो ! अमरत्वाखेरीज दुसरी कोणतीही गोष्ट मागून घे असा मी तुला वर दिला अन् तू 'आपल्या देशात तयार झालेली छोटी मोटारगाडी स्वतःच्या मालकीची व्हावी ' असं मागून घेऊन माझ्यावर मात केलीस ! ! "

शनिवार, २६ सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : एकविसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ रोखलेल्या बंदुका आणि उठलेली जनता हे तीन लेख वाचले. गरिबी आणि दारिद्र्य घालविण्यासाठी नक्षलवाद उपयोगी आहे हे बरोबर नाही. पूर्वी पेंढारी हेच काम करीत. तेच काम काही नक्षलवादी करीत आहेत. राज्यकर्ते नालायक असल्यास संसदेने जनतेस मताधिकार दिला आहे त्याद्वारे परिवर्तन घडवून आणून गरिबी व दारिद्र्य घालविता येईल. २२ वर्षांनंतर ही अशी परिस्थिती रहावी हे पाहून रक्त खरोखरच तापते. पण म्हणून तो (नक्षलवाद) उपयोगी नाही. याने अराजक माजेल. श्री. अनिल बर्वे यांनी ज्वलंत विषयावर लिखाण लिहिल्याबद्दल मात्र त्यांचे अभिनंदन.

१२ सप्टेंबर, १९७० — टी. आर. बोरा

◻ रोखलेल्या बंदुका उठलेली जनता ही लेखमाला फारच प्रभावी वाटली. श्री. अनिल बर्वे यांनी सर्वस्वी अनोख्या परंतु सत्य असलेल्या घटनेबद्दल अभ्यासपूर्ण-रीतीने मांडलेले विचार ज्वलंत व प्रशंसनीय खचित आहेत. त्याबद्दल त्यांचे मनः-पूर्वक अभिनंदन !

सदाशिव पेठकरांच्या दिल्ली—दरबारात खंड पडल्यास चुकल्यासारखे होते. तेंडुलकरांची रातराणी रंग भरतेय्. 'अंदाज' बरीच जागा अडवतोय्. अरुणा गोसावींची मुंबई—वार्ता चांगली असते. द्विसाप्ताहिकाचा उपक्रम स्तुत्य, परंतु आठवड्यातील दोन्ही अंकात कथेचा अट्टाहास का ?

१५ सप्टेंबर, १९७० — रवींद्र दाणी, नासिक

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

# रिपब्लिकन पक्ष....युती नाहीतर सर्वनाश....

सध्या सर्वच राजकीय पक्षात फूट पडण्याचे दिवस आहेत. या फुटीच्या राजकारणाची अतिशय तीव्र झळ रिपब्लिकन पक्षालाही लागलेली आहे. या पक्षाची अवस्था वादळात सापडलेल्या, सुकाणू आणि कप्तान नसलेल्या फुटक्या तारवा–सारखी झाली आहे रिपब्लिकन पक्षाची खरी ताकद महाराष्ट्रातच आहे. त्यामुळे या फुटीरतेचे दुष्परिणाम याच राज्याला अधिक भोवणार. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व हरिजनांना एका झेंड्याखाली आणले. पण त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची जागा घेणारा, त्याचप्रमाणे अखिल हरिजनांचे नेतृत्व मिळविणारा नेता रिपब्लिकन पक्षात उरला नाही आणि लगेच फुटीरतेला सुरुवात झाली. विदर्भात आवळे गट फुटून निघाला. इकडे मुंबईकडे कांबळे गट दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली एक मोठा गट टिकून होता. पण आता याही गटाच्या ऐक्याला सुरुंग लागलेला आहे. दादासाहेब गायकवाड यांच्या गटातून आता बॅ. बी. डी. खोब्रागडे यांचा गट फुटून निघतो आहे. अर्थात खोब्रागडे गटाचे म्हणणे हे की पक्षातून गायकवाड गट फुटून निघतो आहे.

पक्षातील या नव्या फुटीरतेला जबाबदार अनेक कारणे आहेत. सर्व राजकीय पक्षातील फुटीरतेचे सर्वसामान्य कारण–वैयक्तिक हेवेदावे–हे अर्थातच इथेही आहेच. ते महत्त्वाचे कारण आहे.

पक्षातल्या नव्या भांडणांना सुरुवात झाली ती महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीपासून. रिपब्लिकन पक्षाचेच रा. सु. गवई हे उपाध्यक्ष-पदावर होते. काँग्रेसच्या पाठिंब्यावर निवडून आले होते. याही वेळी रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारालाच त्या पदासाठी निवडून द्यायचे असा नव्या काँग्रेसचा समझोता होता. रिपब्लीकन पक्षाचे दोन उमेदवार उभे राहिले. एक गवई आणि दुसरे बाबासाहेब आंबेडकरांचे चिरंजीव श्री. भैय्यासाहेब आंबेडकर. दोघांचेही म्हणणे असे की मीच पक्षाचा अधिकृत उमेदवार. गवईंनी पक्षाच्या अध्यक्षांचे पत्रच आणले. आंबेडकरांना कार्यकारिणीचा पाठिंबा होता. नव्या काँग्रेसने गवईंना पाठिंबा द्यायचे ठरविले. त्यामुळे ऐन वेळी दुसऱ्या उमेदवाराने आपले नाव काढून घेतले.

तेव्हापासून तणातणी उघडकीला येऊ लागली. गेले एक दीड वर्ष दादासाहेब गायकवाड अतिशय आजारी आहेत. त्यांना अंथरुणावरून नीट उठता येत नाही आणि बरोबर वाचताही येत नाही असे सांगतात. त्यामुळे गवई, श्रीमती शांताबाई दाणी आणि श्री. कुंभारे हे कार्यकारिणीचे सदस्य त्यांच्याकडून वाटेल त्या कागदा-वर सह्या घेतात असा इतरांचा आरोप आहे.

हे प्रकरण फार वाढू नये म्हणून पक्षाच्या कार्यकारिणीची एक बैठक दि. १५ ऑगस्ट रोजी दिल्लीला भरविण्यात आली. अध्यक्ष दादासाहेब गायकवाड यांच्या सल्ल्यानेच ही बैठक भरविण्यात आल्याचे सांगतात. स्वत: गायकवाडच त्या बैठकीत हजर राहणार होते. पण प्रकृती–अस्वास्थ्यामुळे त्यांना ते जमले नाही. इकडे श्री. गवई यांनी




या कार्यकारिणीचा उद्देशच वेगळा असल्याचा प्रचार करायला सुरुवात केली. गवई शांताबाई दाणी आणि कुंभारे या बैठकीला गैरहजर होते.

श्री. दादासाहेब गायकवाड यांच्या आजाराचा गैरफायदा काही मंडळी उठवितात म्हणून त्यांना अध्यक्षपदी कायम ठेवून त्या पदाचे काही अधिकार पक्षाचे सरचिटणीस श्री. खोब्रागडे यांना देण्याचा ठराव या कार्यकारिणीने केला.

झाले. इकडे दादासाहेबांना कुणी काय सांगितले कुणास ठाऊक. त्यांनी एक पत्रक काढून खोब्रागडे यांची सरचिटणीसपदावरून हकालपट्टी केली आणि त्यांच्या जागी श्री. कुंभारे यांची नेमणूक केली.

कार्यकारिणीच्या इतर सदस्यांचे म्हणणे दादासाहेब गायकवाडांनी ही गोष्ट गवई, कुंभारे, दाणी या त्रिकूटाच्या सल्ल्याने केली. वास्तविक पाहता पक्षाच्या घटनेप्रमाणे कार्यकारिणी सार्वभौम आहे. सरचिटणीस आणि अध्यक्ष यांना त्यांच्या पदावरून दूर करण्याचा अधिकार फक्त कार्यकारिणीलाच आहे. अध्यक्ष पत्रक काढून सरचिटणीसाला काढून टाकू शकत नाहीत. पण दादासाहेबांच्या अर्धांगवायूच्या दुखण्याचा फायदा घेऊन या त्रिकूटाने ही गोष्ट घडवून आणली असे त्यांचे म्हणणे.

गवई आदी त्रिकूटाचे म्हणणे अर्थातच याच्या अगदी उलट. ते म्हणतात, दादासाहेब आजारी असले तरी कोणत्याही कागदावर सही करतील अशी त्यांची परिस्थिती नाही. खोब्रागडे यांना काढून टाकणे हे अध्यक्षांच्या अखत्यारीत आहे.

एकदा भांडणाला सुरुवात झाल्यानंतर मग काय विचारता. रोज पत्रके–आरोप–प्रत्यारोप. गवई गटाचे म्हणणे की खोब्रागडे यांच्या मागे एकही माणूस नाही. फुटून जाऊ द्या त्यांना. महाराष्ट्रात एक अनुयायीही मिळणार नाही. खोब्रागडे गटाचे म्हणणे पक्षातील बहुमत आमच्या बाजूला आहे. कार्यकारिणीच्या दिल्ली बैठकीला २६ पैकी १९ सदस्य हजर होते. गायकवाडांच्या आजारपणामुळे गवई गट शेफारला आहे वगैरे.

कार्यकारिणीच्या खोब्रागडे गटाचे एक सदस्य म्हणाले, गवईंना उपसभापतींच्या जागेसाठी उभे केले नसते तर ते काँग्रेसमध्येच गेले असते.

पक्षातील फूट टाळण्याचे अनेक प्रयत्न झाले. बारा सप्टेंबरला खोब्रागडे नाशिकला जाऊन श्री. दादासाहेब गायकवाड यांना भेटले आणि पक्षात पूर्ववत परिस्थिती निर्माण करावी असे ठरले. या सूचनेनुसार गायकवाडांचे अध्यक्षपदाचे अधिकार कायम राहतील आणि खोब्रागडे हेही सरचिटणीसपदावर कायम राहतील. गायकवाडांनी ही गोष्ट तत्वत: मान्य केली. पण दरम्यान त्यांनी श्री. कुंभारे यांना सरचिटणीसपदी आधीच नेमले होते. त्यांच्याशी विचार-विनिमय करून निर्णय घेऊ असे त्यांनी सांगितले.

इथेच सारे बिनसले. कुंभारे काय सल्ला देणार हे त्यांना माहीत होते. त्यामुळे फूट टाळण्याचे प्रयत्न असफल झाल्याचे त्यांनी जाहीर करून टाकले. याप्रसंगी श्री. खोब्रागडे यांनी जे निवेदन केले ते महत्त्वाचे आहे. ते म्हणाले, पक्षाचे कार्य सुरळीत चालावे म्हणून मला कार्यकारिणीने काही खास अधिकार दिले. श्री. गायकवाड आजारी असल्याने हा निर्णय घेण्यात आला. पण काही सभासदांनी या निर्णयाला हरकत घेतली. माझ्या बाजूला बहुमत आहे. तरीही केवळ पक्षात एकोपा टिकावा म्हणून हे अधिकार सोडण्यास मी तयार होतो. पण तडजोडीच्या मुद्यांबाबतचा निर्णय आपण कुंभारे आणि गवई यांच्या उपस्थितीतच जाहीर करू नये असे गायकवाड यांनी सांगितले. पण कुंभारे आणि गवई यांनी आधीपासूनच ऐक्यविरोधी भूमिका स्वीकारली आहे.

खोब्रागडे म्हणाले, श्री. गायकवाड हे कुंभारे, गवई, दाणी या त्रिकूटाच्या 'बदसल्ल्याने' चालतात म्हणूनच ही फूट अटळ झाली आहे. बाबासाहेब आंबेडकरही काही काळ असेच दोन व्यक्तींच्या 'बदसल्ल्याने' चालत होते आणि झळ खुद्द कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनाच लागली होती. आज ती झळ पक्षाच्या ऐक्याला लागते आहे हे दलित समाजाचे दुर्दैव आहे.

महाराष्ट्रातील दलित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या रिपब्लिकन पक्षाची अशी अवस्था व्हावी हे खरोखरच दुर्दैव आहे. आधीच या समाजाचे नेतृत्व एकसंघ नव्हते. आता पक्षही दुभंगला. खोब्रागडे गट म्हणतो आहे की आवळे आणि कांवळे गट आम्हाला येऊन मिळतील. पण ती शक्यता अजून तरी दूर आहे. तसे खोब्रागडे गटाचे प्रयत्न मात्र चालू आहेत.

१९७२ च्या निवडणुकी स्वतंत्रपणे स्वत:च्या ताकदीवर लढवाव्या असे खोब्रागडे गटाचे म्हणणे आहे. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाने नव्या काँग्रेसशी समझोता केल्याने काही ठराविक मतदार संघातून रिपब्लीकन उमेदवार निवडले गेले. पण त्याचा परिणाम दलित समाजाच्या प्रगतीवर झाला आहे असे या गटाचे म्हणणे आहे. काँग्रेसची लाचारी निर्माण झाली आणि समाजाचे प्रश्न पोटतिडिकीने मांडता आले

नाही. हरिजन बौद्धजनांवर खेड्यापाड्यात अन्याय-अत्याचार करणाऱ्यांमध्ये काँग्रेस-चेच लोक प्रामुख्याने आहेत हे विसरता येत नाही.

आवळे-कांबळे गट खोब्रागडे गटाला येऊन मिळाले तर रिपब्लिकन पक्षाचे पुनरुज्जीवन झाल्यासारखे होईल. नाहीतर या फुटीतून सर्वनाशाशिवाय काहीच निष्पन्न होणार नाही.

## सीमा प्रश्न....जैसे थे

चावून चोथा झालेल्या आपल्या सीमा प्रश्नाला कुरतडण्यासाठी पुन्हा दात लावायचे म्हणजे शरम आहे. पण इलाज नाही. कारण गेल्या महिन्यात या भांडणाची एवढी चर्चा झाली. आज नेमकी परिस्थिती काय आहे ? नेमकी परिस्थिती काहीच नाही. म्हणजे निश्चित अशी प्रगतीच नाही. दहा वर्षांपूर्वीची जैसे थे परिस्थिती कायम आहे.

महाजन अहवालावर संसदेची संयुक्त समिती नेमण्याचा विचार चालू असल्याचे प्रधानमंत्र्यांनी मध्यंतरी सांगितले होते. त्यावर लगेच उलट सुलट प्रतिक्रियाही निर्माण होऊ लागल्या होत्या आणि या वादाच्या सोडवणुकीला आता काही वळण लागते आहे असे वाटू लागले होते. पण लगेच म्हैसूरात इंदिराबाईंनी सांगून टाकले की संयुक्त समिती नेमण्याच्या तोडग्यावर अजून अंतिम निर्णय झालेला नाही. अनेक तोडगे विचारासाठी मांडले तसाच तोही एक तोडगा आहे. स्वीकारला गेल्यास त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

दरम्यान जुन्या काँग्रेसच्या नेत्यांनी या सूचनेला तीव्र विरोध केल्याच्या बातम्या आहेत. जुन्या काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते, डॉ. रामसुभगसिंग हे तर असेही म्हणाले म्हणे की, महाजन अहवालासाठी संसद समिती नेमण्याची काही गरज नाही. महाराष्ट्राचा विरोध सहन करूनही त्या अहवालाची काटेकोरपणे अंमल-बजावणी व्हायला हवी !

रामसुभगसिंगांनी असे बोलण्याच्या आधी महाराष्ट्राच्या नाईक-निंबाळकरांशी विचारविनिमय केला होता की नाही कुणास ठाऊक. या निवेदनावर नाईक-निंबाळकरांची प्रतिक्रिया काय आहे तेही कळले नाही. पण जुन्या काँग्रेसला हे निवेदन महाराष्ट्रात महाग पडेल. अर्थात जुन्या काँग्रेसला महाराष्ट्रापेक्षा म्हैसूरची अधिक फिकीर आहे. रामसुभगसिंग यांचे निवेदन वेगळे असते तर ते त्यांच्या पक्षाला महाग गेले असते. कारण आख्खी म्हैसूर काँग्रेस जुन्या काँग्रेसच्या मागे सॉलीड उभी आहे. संसदीय समिती नेमण्याच्या सूचनेला अर्थातच म्हैसूरचा कडाडून विरोध आहे.

इकडे नेहमीप्रमाणे मुख्यमंत्री नाईक सीमा प्रश्नावर इंदिरा गांधींतर्फे काही घोषणा होण्याची वाट पाहत आहेत. एखादी घोषणा निश्चितपणे येत्या काही

दिवसात होईल असा नेहमीप्रमणे विश्वासही त्यांना वाटतो आहे. सप्टेंबर २६–२७ ला श्री. नाईक दिल्लीला जात आहेत. तेव्हा इंदिराबाईंची त्यांची पुन्हा भेट होईलच. लुसाकाला जाताना इंदिराबाई मुंबहून निघाल्या तेव्हा बाँबच्या भीतीने त्यांचे विमान परत आले होते. तेव्हा म्हणे मुख्यमंत्री नाईक व प्रधानमंत्री गांधी यांच्या दीड तास मनमोकळ्या गप्पा झाल्या. कारण तेवढा वेळ इंदिराबाई पुढच्या विमानची वाट बघत सांताक्रूझला खोळंबून होत्या. अर्थात या चर्चेत काय निष्पन्न झाले ते अजून बाहेर आलेले नाही. पण यावेळी जेव्हा नाईक काही घोषणा होण्याची वाट पाहत आहेत तेव्हा त्यात निश्चितच काही अर्थ असला पाहिजे.

परंतु संसद समितीच्या नेमणुकीच्या घोषणेची श्री. नाईक वाट पाहत असतील तर त्यांना आणखी काही काळ वेळ काढवी लागेल. कारण दिल्लीच्या वातम्या अशा आहेत की अशा समितीची स्थापना एवढ्यात होणे शक्य नाही. केंद्र सरकारने लोकसभेचे स्पीकर श्री. धिल्लन आणि राज्यसभेचे सभापती, भारताचे उपाध्यक्ष श्री. जी. एस. पाटक यांना अशी संयुक्त समिती नेमावी अशी विनंती केली होती. पण सभागृहाच्या संमतीशिवाय संयुक्त समिती नेमण्यास या दोघांनीही नकार दिल्याच्या वातम्या आहेत. त्यामुळे ही समिती नेमली जाण्यासाठी आता संसदेच्या हिवाळी अधिवेशनापर्यंत वाट पहावी लागणार आहे. कारण आता तेव्हाच दोन्ही सभागृहात ठराव आणून तशी समिती नेमावी लागेल.

इकडे महाराष्ट्र कॉंग्रेसने सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात प्रदेश समितीची तातडीची बैठक बोलाविली होती. विषय होता अर्थातच सीमा प्रश्न. पण दिल्लीहून पुन्हा काही चाव्या फिरल्या. आणि यशवंतरावही परदेशी रवाना झाले. त्यामुळे ही बैठक स्थगित करण्यात आली. आता ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात भरणार आहे. यशवंतरावही बैठकीला हजर असतीलच. बघू या काय घडते आहे ते.

म्हणजे एकूण सर्व घडामोडींचा निष्कर्ष एकच की सीमाप्रश्नाची सोडवणूक एका सेकंदानेही जवळ आलेली नाही. उलट जुनाच लपंडाव अद्याप जोरात चालू आहे. ससद समितीची नेमणूक म्हणजे तर बेमुदत कालहरणाला निमंत्रणच होईल. कारण समित्यांच्या कामाला वेळ लागतोच. समिती नेमली की, तिच्या बैठकी होतील, परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पाहणी होईल, वादविवाद होऊन शिफारशी ठरतील आणि नंतर त्या संसदेपुढे येतील. संसदेमध्ये पुन्हा त्या शिफारसीवर चर्चा होणार. म्हणजे केवढी दमछाक.

पण मग मुख्यमंत्री नाईक कशाची वाट पाहत आहेत? त्यांना इंदिराबाईंची पद्धत माहीत आहे. चंदीगड बाबतीत ही पद्धत त्यांनी वापरली होती. भांडणे होऊ द्यायची, वादविवाद करायचे, अनेक तोडगे पुढे करून दोन्ही पक्षांना मेटाकुटीला आणायचे. लढून ओरडून दोन्ही बाजू पार थकल्या की आपल्याला हवा तो निर्णय घेऊन टाकायचा. म्हणजे त्याला विरोध करायला दोन्ही बाजूत फारसा जीव राहता कामा नये. चंदीगड–फाजिलका प्रकरणी तसेच झाले. तसल्याच कुठल्या निर्णयाची

मुख्यमंत्री वाट पाहत आहेत का ? की संसद समितीच्या नियुक्तीची ?

कृष्णा देसाई यांच्या निधनाने रिकाम्या झालेल्या विधानसभेच्या परळ मतदारसंघाची पोट-निवडणूक ऑक्टोबर अठराला होणार असल्याचे घोषित करण्यात आले आहे. मतदारसघातून प्रचाराला लगेच सुरुवातही झाली आहे. निवडणुकीला आता एक महिनाही अवधी नाही. त्यामुळे सारेच घाईत होणार आहे.

या सामन्यासाठी कम्युनिस्ट पक्षाने कृष्णा देसाई यांच्या पत्नीला उभे करण्याचे ठरविले आहे तर शिवसेनेने श्री. वामनराव महाडीक यांची उमेदवारी घोषित केली आहे. जनसंघही ही निवडणूक लढविणार आहे. इतर पक्षांचे उमेदवार अद्याप ठरायचे असले तरी खरी लढत कम्युनिस्ट आणि शिवसेना यांच्यातच होणार असे दिसते.

या पोट – निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे शिवसेनेचा अधिकृत उमेदवार प्रथमच विधानसभेसाठी उभा राहत आहे. १९६७ च्या निवडणुकीत शिवसेनेने निवडक कम्युनिस्ट – विरोधी उमेदवारांना पाठिंबा दिला होता. बाहत्तरमध्ये शिवसेना स्वतःचे उमेदवार उभे करणार आहे. त्याची नांदी म्हणजेच ही पोट–निवडणूक.

या पोट – निवडणुकीला धार चढण्याचे कारण शिवसेना आणि कम्युनिस्टांचा संघर्ष. या वैरभावातूनच कृष्णा देसाईंचा खून झाला हे अधिकृत जाहीर झाले आहे. खुनाचे जे आरोपी पकडण्यात आले आहेत त्यांच्यावर तसे आरोप ठेवण्यात आले आहेत. शिवसेनेने कम्युनिस्ट विरोधाची शपथ घेतलेली आहे. आणि कम्युनिस्टांनीही शिवसेनेशीच आपणाला प्रथम दोन हात करायचे आहेत हे जाणलेले आहे. त्यामुळे या निवडणुकीला सर्व तऱ्हेचा रंग चढणार हे नक्की. शिवाय परळ मतदार संघ म्हणजे पूर्वीचा कम्युनिस्टांचा बालेकिल्ला. तिथल्या तरुणांमुळे शिवसेनेचाही तिथे जोर आहे. त्यामुळे हा मुकाबला मोठा ईर्षेचा होईल. कुणी सांगावे, काही डोकीही फुटतील. बाहत्तर साली मुंबईत काय होणार आहे याचे ट्रेलर कदाचित या पोट-निवडणुकीत दिसेल.

कारण १९७२ मध्ये मुंबईत शिवसेना आपल्या सर्व शक्तीनिशी निवडणुकीत उतरणार आहे. संपूर्ण मुंबई जिंकायची शिवसेनेची ईर्षा आहे. त्या निवडणुकीत कम्युनिस्ट – शिवसेना यांची लढाई खऱ्या रंगात येईल. दरम्यान अठरा ऑक्टोबरची रंगीत तालीम पाहून मुंबईत वारा कोणत्या दिशेने वाहतो आहे हे कळू शकेल.

– अरुण गोसावी



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

केव्हातरी तुम्हाला एखादी व्यक्ती भेटते. भेटल्यानंतर नमस्कार चमत्कार होतो. काही वेळा तुमच्याबरोबर असलेल्या तुमच्या मित्राच्या ओळखीचं कोणीतरी भेटतं आणि ती व्यक्ती तुमच्याशी ओळख करून घेऊ इच्छित आहे असं समजा. व ही ओळख करून घेताना नमस्कार करून 'आपला परिचय' असे तुम्हाला त्या व्यक्तीनं विचारलं तर हमखास ती व्यक्ती आर्. एस्. एस्, वा जनसंघाची असावी असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. एखाद्या 'प्रातः' 'सायं' किंवा 'रात्र' शाखेकडे आपण फिरकलात तर 'दक्ष,' 'आराम,' 'विश्रम' 'अग्रेसर' इत्यादी शब्द तुमच्या कानावर येतील. किंवा 'दंडा'चे (म्हणजे लाठीचे) प्रकार करणारी वा हुतुतू–खोखो आदि भारतीय खेळ खेळणारी मंडळी दिसतील. या मंडळीत लहान मुलांपासून ते वृद्धत्वाकडे झुकणाऱ्यांपर्यंत मंडळी दिसतील खरी, पण कित्येक शाखांमध्ये तरुण मंडळी थोडी अभावानेच असलेली दिसतील. अशा या संघाबद्दल मधून मधून काहीतरी बोललं जातं, कधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घाला असा कल्लोळ केला जातो तर कधी कधी जातीय दंगलींना संघच जबाबदार असल्याचा आरोप केला जातो. असा हा 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आहे कसा, तेथे कोणतं कार्य चालतं व काही लोकांची संघाबद्दलची काय मतं आहेत हे जाणून घ्यावं अशी खूप इच्छा होती. त्यातूनच हा पुढील आलेख तयार झाला.

संघाच्या स्वयंसेवकांना सोईचं व्हावं म्हणून तीन प्रकारच्या वर उल्लेख केल्याप्रमाणे शाखा भरतात. शाखेचं स्वरूप समजावून घेण्यासाठी आपण तेथे गेलो तर 'रोममध्ये रोमन्सप्रमाणे वागा' या म्हणीप्रमाणे प्रथमतः भगव्या ध्वजाला व नंतर 'शाखा कार्यवाह' यास प्रथम 'प्रणाम' करावा लागतो. 'दक्ष' 'विश्रम' आदी आज्ञा पाळाव्या लागतात, प्रसंगी खेळातही भाग घ्यावा लागतो व शाखा संपताना पुन्हा स्वयंसेवकांप्रमाणे सर्व सोपस्कारात भाग घ्यावा लागतो. शाखेची सुरुवात 'कराग्रे वसते लक्ष्मी' या प्रार्थनेने होते. शाखेचा नित्यनियमाने चालणारा कार्यक्रम म्हणजे हुतुतू आदी खेळ, 'दंडा'चे प्रकार किंवा कधीमधी आयोजित केलेले 'बौद्धिक.' पण हे 'बौद्धिक' म्हणजे फक्त संघाबद्दल कोणीतरी वरिष्ठ संघनेत्यानं दिलेलं व्याख्यान. इतर विषयांवर चर्चा वा प्रश्नोत्तरे हा कार्यक्रम कधीच नसतो. नेहमीच्याच या कार्यक्रमामुळे प्रश्न असा निर्माण होतो की हे सर्व क्रियाशील आहे का? म्हणूनच अनेकांना वाटतं की १९२५ साली स्थापन झालेला 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आज १९७० मध्येही आहे त्याच अवस्थेत आहे. स्वयंसेवकाच्या व्यक्तिमत्त्वाला धार आणण्याचं, आधुनिक जगात वावरताना त्याला

आवश्यक करणारं असं नवं ज्ञान वा दृष्टी देण्याचं कार्य संघानं केलेलं नाही म्हणूनच आजचा तरुण संघाकडे विशेष जात नाही. तो शिवसेनेकडे जाणं पसंत करतो, कारण त्याला आकर्षित करणारं संघाकडे काही नाही. तरुणांच्या प्रवृत्तीला साजेशी असणारी धडाडीची प्रवृत्ती संघाकडे नाही. म्हणूनच पिढीमागून पिढीला संघ निष्क्रिय बनविण्यापलीकडे संघाचं काँट्रिब्युशनच नाही. शिवाय संघ अहिंदू-विरुद्ध जातीय द्वेष फैलावतो म्हणून संघावर बंदी घातली पाहिजे असंही म्हटलं जातं. संघाविषयीची पुढील व्यक्तींची मतंच या सर्व गोष्टींचा ऊहापोह करणारी आहेत. या व्यक्ती आहेत जनरल करिअप्पा, प्रो. ए. बी. शाह, प्र. स. पक्षाचे प्रांतिक सचिव श्री. नाना सावंत, साम्यवादी मार्क्सवादी पक्षाचे कॉ. प्रभाकर संझगिरी, भारतीय मजदूर संघाचे श्री. गजाननराव गोखले. अर्थातच संघाबद्दलच्या आक्षेपांना उत्तरे दिली आहेत; 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र, गुजरात, गोवा विभागाचे संघटक श्री. मोरोपंत पिंगळे व शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार व संघाचे एक कार्यकर्ते श्री. गो. श्री. जोगळेकर यांनी.

भारताचे माजी सरसेनापती जनरल के. एम्. करिअप्पा हे संघाकडे आशास्थान म्हणून पहातात. 'संघाकडे दिलेलं कोणतंही कठीण कार्य अत्यंत शिस्तबद्ध रीतीनं पार पाडलं जातं असं सांगतानाच ते, संघानं 'जातीयवाद' व 'राजकारण' यापासून दूर रहावं असंही ठामपणे म्हणतात. इतर धर्मीयांना संघात येण्यास वाव देऊन व 'जातीयवादी' प्रवृत्तींशी फारकत करून संघाने देशातील तरुणांच्या मनामध्ये राष्ट्रीयबाणा, देशभक्ती, उच्च प्रतीची शिस्त, कर्तव्य, त्याग व समर्पण-भाव याची ज्योत पेटवली पाहिजे, व हे करण्यासाठी संघसंचालक श्री. गोळवलकर गुरुजी यांनी स्वयंसेवकांना देशभर हिंडून अशा प्रकारचं कार्य करायला सांगितलं पाहिजे अशी आग्रहाची विनंतीही ते करतात.

प्रा. ए. बी. शाह हे संघावर जातीयतेचा शिक्का मारतातच आणि संघ अ-हिंदू-विरुद्ध जातीय विद्वेष पसरविणे हाच संघाचा उद्देश असल्याचं म्हणतात. पण त्याच-बरोबर हेही प्रांजळपणे मान्य करतात की संघाने जातीय द्वेष पसरविण्याचा प्रयत्न केला असा आरोप करणारे अजूनही न्यायालयात हा आरोप सिद्ध करणारा पुरावा उपलब्ध करून देऊ शकलेले नाहीत. असं जरी असलं तरी तामिरे-मिल्लत, काश्मीरमधील सार्वमत आघाडी, शिवसेना, गोपाळसेना, साम्यवादी, मार्क्सवादी व नक्षलवादी यांच्यावरही बंदी घालावी अशी कोणी का विचारणा करीत नाही? ती मागणी केली जाते फक्त संघाबाबतच. अर्थातच बंदीनं प्रश्न सुटत नाहीत. जातीयवाद जोपासला जाऊ नये म्हणून काही तरी ठामपणे केल्याशिवाय अशा बंदीला अर्थच रहाणार नाही. नाही तर रोगापेक्षा इलाजच भयंकर ठरायचा.

श्री. नाना सावंत यांचं असं म्हणणं की विद्यार्थीदशेत असताना व नंतर १९४७ साली संघाचं कार्य जवळून पहाण्याची त्यांना संधी मिळाली आणि तेव्हापासून

आजतागायत संघ आहे तसाच, आहे तिथेच असल्याचं दिसतं. संघाचा पिंडच मुळी जातीयवादी असून याच विचारावर तो पोसलेला आहे. 'हिंदूंसाठी हिंदुस्थान' ही त्यांची 'मानसिक बैठक.' पारशी, मुस्लीम इत्यादी या देशातील इतर धर्मीय हे हिंदुस्थानचे रहिवासी म्हणून हिंदू असं जरी संघाचे लोक म्हणत असले तरी हा 'स्ट्रॅटेजी 'चा भाग आहे. असं जर आहे तर मग त्या धर्मीयांना संघात प्रवेश का नको? किंबहुना इतर धर्मीयांना प्रवेश दिल्यास संघाचं अस्तित्वच धोक्यात येईल. संघ ही एक प्रचंड राष्ट्रवादी शक्ती आहे हे सत्य आहे; पण तेथे स्वयंसेवकांवर होणाऱ्या संस्कारांचं स्वरूपच असं असतं की ते तरुण मनाला काही करण्याची ओढ लावत नाहीत. त्यांच्यात जिद्द वा महत्त्वाकांक्षा निर्माण केली जात नाही, त्यामुळे ते बुळे बनतात. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याबाबतही संघ मागेच पडतो. 'तो क्षण येईपर्यंत आम्ही थांबणार आहोत' अशा घोषणा संघनेते करतात पण 'तो क्षण केव्हा येणार?' हा आमचा सवाल आहे! 'संघाची वाढ म्हणजे राष्ट्रद्रोह्यांना पायबंद' असा दावा केला जातो, पण ही घोषणा म्हणूनच ठीक, तसा प्रकार झाल्याचं माझ्या पहाण्यात नाही–' इति श्री. सावंत. इतिहासाचे पोवाडे गाणारे, शिवाजीचा भगवा झेंडा प्रथम हाती घेणारे स्वयंसेवक संघात आहेत, पण शिवाजीची धडाडी, लढाऊपणा कुठे आहे त्यांच्यात? शिवसेनेचा मार्ग चुकीचा असेल पण हा लढाऊपणा त्यांच्यात आहे. हे डॅशींग स्पिरीट शिवसेनेनं दाखवून दिलं आहे. अन्यायाविरुद्ध उभी रहाणारी संघटना म्हणूनही संघाची प्रतिमा नाही. संघाकडे उत्कृष्ट संघटन आहे, प्रचंड शक्ती आहे, तेथे निमलष्करी शिक्षण दिलं जातं, पण ज्याप्रमाणे उपयोगात न आणलेलं शस्त्र गंजतं, तशीच संघाची अवस्था आहे? याचाच अर्थ तरुणांना निष्क्रिय बनविण्यापलीकडे संघाचं काँट्रिब्युशन नाही.'

रा. स्व. संघ व साम्यवादी ही दोन वेगवेगळी टोके म्हणूनच संघ हा साम्यवाद्यांना 'रायव्हल' वाटतो का? संघाबद्दल त्यांना काय वाटतं? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावली घेऊन कॉ. प्रभाकर संझगिरी यांच्याकडे गेलो. वाटलं होतं प्रश्न विचारताना त्यावर इतरांबरोबर झाली त्याप्रमाणे चर्चा होईल. पण साम्यवाद्यांना संशयानेच पछाडले आहे की काय कोण जाणे! त्यांनी प्रश्नावली स्वतःकडे घेऊन काही ठराविकच प्रश्नांची उत्तरे स्वतः लिहून दिली. त्यात काहीही बदल न करता ती तशीच देत आहे.

'संघ जातीयवादी आहे. संघाची राष्ट्रवादाची व्याख्याच मुळात जातीयवादी आणि हिंदू पुनरुत्थानवादी आहे. जातीय दंगे पेटविण्यात व चिघळविण्यात संघीयांचा पुष्कळ ठिकाणी हात असतो.

चातुर्वर्ण्याविद्दलची गुरुजींची मतं देशाला दोन हजार वर्षं मागे ओढू पहाणारी आणि श्रमिक वर्गांना गुलाम बनवू पहाणारी आहेत. संघीय जातीयवादी ही मुस्लिम जातीयवादाची प्रतिक्रिया नाही, धनिक वर्गातील फॅसिस्ट प्रवृत्तीचाच तो आविष्कार

आहे हे गुरुजींच्या त्या मतांवरून स्पष्ट होतं. गुरुजींची व संघनेत्यांची जागतिक राजकारणाबद्दलची मते समाजवादी देशांना कट्टर विरोध करणारी आहेत हे या प्रवृत्तीस धरूनच आहे. ह्या फॅसिस्ट विचारसरणीच्या जोडीस निमलष्करी शिक्षण व संघटना आली म्हणजे फॅसिस्ट शक्ती तयार होते व ते संघाचं स्वरूप आहे.

सध्याच्या काळात जातीयवादी प्रचाराला आणि कृत्यांना आळा घालण्याच्या व ती करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याच्या ज्या तरतुदी आहेत त्यांचा उपयोग सरकारनं संघादी जातीयवाद्यांविरुद्ध केलेला नाही तो प्रथम करावा, मगच बंदीचा प्रश्न उपस्थित होतो. तो न करणाऱ्या सरकारनं बंदीचा प्रश्न पुनः पुनः उपस्थित करणं याचा अर्थ कोणत्याही सरकारविरोधी संघटनेवर बंदी घालण्याचा अधिकार सरकार मिळवू पहात आहे असा होतो. असा सोटेशाही अधिकार सध्याच्या भांडवलदारी–जमीनदारी सरकारला देण्यास आमचा विरोध आहे.

धर्मनिरपेक्षता, कष्टकरी जनतेचं ऐक्य, लोकशाही व समाजवाद यावर निष्ठा असणाऱ्यांनी संघीय विचारसरणीविरुद्ध वैचारिक व राजकीय लढा अत्यंत निष्ठूर-पणे चालविला पाहिजे. त्याला जर शासनाकडून जातीयवाद दडपणाऱ्या उपाय-योजनेची जोड मिळाली तर त्या विषारी प्रतिगामी विचारसरणीचा व संघटनेचा बीमोड करता येईल. परंतु स्वतःला धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी म्हणवणारे सर्व लोक याबाबतीत स्पष्ट भूमिका घेत नाहीत, त्याचप्रमाणे राज्यकर्ते स्वतः जातीयवादापासून अलिप्त नाहीत. ' – कॉ. संझगिरी. श्री. गजाननराव गोखले हे पाँडेचेरी आश्रमातील संस्कारात वाढलेले, नंतर संघाशी व 'भारतीय मजदूर संघाशी' त्यांचा संबंध आला. कामगार चळवळीतील नेते असलेले श्री. गोखले यांचा व्यासंग दांडगा आहेच. पण त्यांच्या स्वभावातही मोकळेपणा आढळतो. रा. स्व. संघाबद्दलची त्यांची मतं पुढीलप्रमाणे आहेत.

संघाला जातीयवादी म्हणणं वा तसं न म्हणणं हा प्रत्येकाच्या दृष्टिकोनाचा प्रश्न आहे. संघाची भूमिका अशी की प्रत्येकानं स्वतःला धर्मानं नव्हे तर देश म्हणून हिंदू मानावं. फक्त हिंदुधर्मच 'युगधर्मा'ची कल्पना सांगतो. युगधर्मात बदल अपेक्षित आहे. हा धर्म स्मृती व श्रुती यावर आधारित आहे. 'एसेंशिअल' जागृती करायची व त्याचं 'ॲप्लिकेशन' शोधून काढायचं ही यामागची भूमिका आहे. येथेच बदल वा युगधर्म येतो. आज हिंदू अनेक गोष्टी विसरलेले आहेत. त्यांना जागृत करणं आवश्यक आहे. हे कार्य संघ करू इच्छितो. ध्येय हे एकदम आकर्षित करणारं नसतं व जे एकदम आकर्षित करणारं ते ध्येयच नव्हे. यामुळे 'दीर्घ मार्गाचा' अवलंब संघाकडून केला जातो. कदाचित याच कारणामुळे अनेकांना संघात काही आकर्षण नसल्याचं वाटणं साहजिकच आहे. अनेकांना हा अपव्यय (वेस्ट) वाटतो. पण जाणून बुजून पत्करलेल्या या मार्गाचे परिणाम दिसतातच. संघातूनच 'जनसंघ', 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषद' 'भारतीय मजदूर

संघ ', ' विश्वहिंदु परिषद ' अनेक शाळाकॉलेजे, वृत्तपत्रे निर्माण झाल्याचं आज दिसतं. कोणताही आकर्षक व ' टाइम बाउंड ' प्रश्न हाती न घेता दीर्घ मार्गाचा अवलंब करून उभारलेला हा पसारा म्हणजे एक प्रचंड काम व ' अचिव्हमेंट ' आहे. कदाचित जनरल पॉलिसी म्हणून जरी अनेक मंडळी संघातून, जनसंघ वगैरे निर्माण झाल्याचं नाकारत असली तरी ती वस्तुस्थिती आहे. रा. स्व. संघानं काही ब्रॉड बेस पॉलिसी आखून दिलेल्या आहेत. पण कारभाराबाबत त्यात संघाची ढवळाढवळ नाही व इतरांना कामाबाबत स्वातंत्र्य आहे. खूप वेळा जनसंघ व इतर शाखांमध्ये क्लॅश येतो हे त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचंच लक्षण होय.' कोणत्याही संघटनेवर बंदी घातल्यामुळे जे ' इसेंशिअल स्पिरिट ऑफ डेडिकेशन ' जे आहे ते नष्ट होणार नाही. जेथे ते स्पिरिट कमी तेथे ती संस्था मोडेल नाही तर ती वाढेलच.

स्वयंसेवक ज्या सामाजिक संस्कारातून येतो त्यापेक्षा तो संघात आल्यावर अधिक उपयुक्त ठरतो. म्हणजेच त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण संघ घडवू शकतो. संघाचे कार्यक्रम पूरपीडितांना सहाय्य वगैरे वगैरेसारखे संघश: न केले जाता ते समाजाचा घटक म्हणून केले जातात.

' लोकप्रियतेवर आरूढ होऊन आपण काही करू शकणार नाही हा संघाचा सिद्धांत आहे. हा जर खोटा ठरला तर संघावर असलेले अनेक आक्षेप खरे ठरतील नाही तर ते खोटे ठरतील. ' श्री. गोखले.

संघाचं स्वरूप राजकीय की सांस्कृतिक याचं श्री. गोखले यांनी दिलेलं उत्तर आहे ' संघ ही सर्वव्यापी संघटना आहे. '

' इतिहासात रमणारे इतिहास घडवू शकत नाहीत ' या बाबा आमटयांच्या विचारांबद्दल श्री. गोखले यांना असं वाटतं की संघाच्या बाबतीत इतिहासच हे ठरवील, संघापुढे भविष्याचीही स्वप्नं आहेत. फक्त सत्तेचं स्वप्न नाही.

श्री. दादूमिया यांनी गुरुजी हे ' Intellectual Indicision ' असल्याचे अलीकडेच म्हटलं. कारण त्यांनी योग्य वेळी योग्य निर्णय न घेता ते त्यानंतर बराच काळ गेल्यावर घेतले आहेत, तर श्री. गोखले यांना गुरुजी Intellectual Patience वाटतात, कारण हीच पद्धत आज पूर्वापार या देशात चालत आली आहे. त्यात परिपक्वता आहे.

" कोणताही आकर्षक कार्यक्रम न घेता संघानं एखाद्या संघटनेबद्दलची जी तीन अंगं ' मॉबिलायझेशन, ऑर्गनायझेशन व लिडरशिप ' त्यातली फक्त ' ऑर्गनायझेशन ' करून दाखविली आहे हे आश्चर्यकारक आहे. ' आज फक्त ' मॉबिलायझेशन ' व ' लिडरशिप ' यांनाच महत्त्व आहे. तेव्हा ही सर्व संघाची ' अचिव्हमेंट नाही काय ?' श्री. गोखले यांनी मला केलेला शेवटचा प्रश्न.

पृष्ठ ५६ वर

ग्यानबा

# मुक्ताफळे

## □ लोट धुळीचा हवेत काढी !

' मध्यवर्ती सरकारने इंडस्ट्रीज ॲक्टखाली भारतात तयार होणाऱ्या मोटारीचा दर्जा का खालावला याची चौकशी करण्याकरता एक कमिटी नेमली आहे. स्वदेशी मोटारीसंबंधी प्रमुख तक्रारी अशा आहेत. १ : सांगाडा करकर वाजतो. २ : दारे लागत नाहीत. ३ : स्टिअरिंग चाक खडखडते. ४ : ऑईल सिले गळतात. ५ : शॉक ॲबसॉर्बर काम देत नाहीत. ६ : एक्झॉस्ट पाईप फुटतात. ७ : वाजवीपेक्षा जास्त पेट्रोल लागते. ८ : मोटारीचा रंग टिकत नाही आणि ९ : चाके सरळ समांतर रेषेत नसतात ! सरकारची अशी खात्री आहे की जर कारखानदारांनी मनावर घेतले तर हे दोष नाहीसे होऊ शकतील.' (कित्ता. 'मुक्ताफळे' माणूस–१९ ऑगस्ट १९६७).

मंडळी, आम्ही वरील नवगुणी स्वदेशी मोटारीची ही तरफदारी तीन वर्षापूर्वी केली होती. जोपर्यंत मोटार चालतच नाही हा दोष निर्माण झालेला नाही, तोपर्यंत जास्तीत जास्त माणसांनी स्वदेशी मोटारीतच बसावे असा आग्रह आम्ही धरला होता. सांगण्यास आनंद वाटतो की खासगी अनौरस कारखानदारांना संधी देऊनही, त्यांनी मनावर घेतले नाही, म्हणून इंदिरा गांधींनी आपले सुपुत्र संजीव गांधी यांनाच स्वदेशी छोटया जनता मोटारगाडीचे लायसन्स शेवटी दिले आहे.

तुम्ही घेणार की नाही ही नवी मोटारगाडी ? आम्ही नक्की घेणार. अहो किंमत फक्त रुपये नऊ हजार ! घेऊन टाका राव. इतकी स्वस्त मोटारगाडी पुनः मिळेलसे वाटत नाही. संजीव गांधींची ही मोटार कमी किंमतीची असली तरी त्यात काहीही कमी नाही. ही मोटारही चार चाकांची असून दोन दरवाजांची आहे. वजनाला हलकी – फक्त ३८० किलोग्रॅम. यात ड्रायव्हर धरून एकावेळी सहा माणसे बसणार आहेत. आता उद्‌घाटनाच्या दिवशी या मोटारीत जगजीवनराम, यशवंतराव, फक्रुमिया, स्वर्णसिंग, शेखअब्दुल्ला अशी सगळी एकदम बसू म्हणतील तर ते मात्र जमणार नाही. कारण अंग चोरून बसणे या मंडळींना शक्य नाही, आणि ही जनता गाडी मुख्यतः हडकुळ्या, जेमतेम पोट भरणाऱ्या मध्यमवर्गीय माणसांसाठीच आहे ! अशी सामान्य माणसे मुलाबाळांना मांडीवर घेऊनही

आत मजेत बसू शकतील. बाकी थोर थोर मंत्रीमंडळी कशाला बसताहेत म्हणा स्वदेशी मोटारीत !

वजनाला हलकी, १४ हॉर्सपॉवर ताकदीची, आणि तासाला जास्तीत जास्त सणसणीत ४० किलोमिटर म्हणजे २६ मैल जाणारी जनता गाडी एकदा विकत घेतली की सामान्य माणसाला, इकडून तिकडे, तिकडून इकडे हेलपाटे मारताना श्रम असे मुळीच वाटायचे नाहीत. सामान्य माणूस आपला सारखा करतोय— पोंऽऽ पोंऽऽ पोंऽऽ! संजीवरावांचा हा जो कारखाना निघणार आहे त्या कारखान्यात वर्षाला ५०,००० गाड्या तयार होणार आहेत. असे असूनही भांडवल किती ? फक्त ३॥ कोटी रुपये. कारण या मोटारीचे निरनिराळे भाग निरनिराळे कारखाने करणार आहेत. उजवा दरवाजा एका कारखान्यात. डावा दुसऱ्या कारखान्यात. पुढची चाके दिल्लीला तर मागची आसामला. बिजागरे चंदिगडहून. तयार पार्ट आले की संजीवराव ते लगेच जोडतील की मोटार तयार! दुसऱ्या एका खामगी उद्योगपतीला पण अशा मोटारीचे लायसन्स दिलेले आहे; परंतु तो सगळे पार्ट स्वतःच्या कारखान्यात करण्याच्या मूर्ख नादात ५० कोटी रुपये कारखान्यात घालणार आहे !

वर्षाला ५०,००० मोटारी म्हणजे काय झाले हो ? प्रत्येक मोटारीत ६ माणसे. वर्षाला तीन लक्ष माणसे मोटारवाली होणार. भारताचे चित्र बदलून जाईल. मोटारीतून जनता पिशव्या घेऊन रेशनला येईल. दुधाच्या बाटल्या मोटारीतून घरी येतील. रांगेत उभे राहून काय वेळ फुकट जाईल तेवढाच. कारकून ऑफिसला मोटारीतून जातील. मास्तर मुलांना लिफ्ट वगैरे देऊ लागतील. काही रस्त्यांवर पाटी लावावी लागेल,' हा रस्ता फक्त हलक्या जनता गाडीसाठी खुला आहे. ' आता तुम्ही म्हणाल — ' जड वाहनांस रस्ता बंद ' अशी पाटी असली तरी तिथून मोठमोठ्या ट्रक्स धाडधाड जातातच. पाटी लावून काहीही होत नाही हे आम्हालाही माहीत आहे, परंतु एक रीत म्हणून पाटी लावलेली केव्हाही बरीच नाही का ?

संजीव गांधींचा भागिदार आहे—हैद्राबादचा निजाम ! दिल्लीचे निजाम व हैद्राबादचे निजाम, या दोघांची ही चारचाकी एकदा रस्त्यारस्त्यातून पळू लागली की आपसातले धर्मभेद विसरून आपण कसे एकत्र पळाले पाहिजे, याची लोकांना जाणीव होईल. देशासाठी हे पहिले व अखेरचे काम करून हैद्राबादचे निजाम आपली सर्व संपत्ती घेऊन कायमचे तुर्कस्तानात रहायला जाणार आहेत असे म्हणतात. निदान मराठी माणसांनी तरी या निजामाला चांगलाच ' सेंड ऑफ ' देणे आवश्यक आहे.

या गाडीत कोण कोण बसणार ? ही गाडी प्रत्यक्ष आमच्या घरी येईल तेव्हा एक या दो बच्चेवर आपण आलेलो असू. म्हणजे ड्रायव्हर धरून ' तो-ती-ते-ते ' अशी चौघे व शिवाय बायकोच्या नात्यातील एक कुणी तरी नेहमी बसू शकेल. नाही तरी आपल्या मोटारगाडीतील रिकामी जागा ही बायकोच्या नातेवाईकांकरताच असते.

या मोटारीची हकिगत वाचल्यापासून आम्ही ज्याला त्याला परवा परवापर्यंत सांगत होतो–' आम्ही मोटार घेणार बरं का !' गेले दोन दिवस मात्र आमचा धीर सुटत चालला आहे व आम्ही गप्प गप्प आहोत. आमचे स्वप्न उध्वस्त करू पहाणारे एक भाकित आमच्या वाचनात आले. वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनचे अध्यक्ष हिमतलाल गांधी यांनी सांगितले आहे–

' उगाच भलत्या भ्रमात राहू नका. जनता गाडी हे शुद्ध थोतांड (myth) आहे. सध्याच्या करांचा भरमसाट बोजा लक्षात घेता भारतात बनवलेली कुठलीही मोटार १५००० रुपयांखाली रस्त्यावर येऊच शकत नाही. संजीव गांधी झाला तरी तो काही ' जादूगार ' नाही.'

अरेरे ! एक ' गांधी ' सामान्य जनतेचे जरा बरे करू पहातो आहे तोच दुसऱ्या ' गांधी 'ने त्याला असा अपशकून का करायचा ? आम्ही म्हणतो नसेल संजीव गांधी जादूगार–पण तो इंदिरागांधींचा मुलगा आहे. हिमतलाल जरा गप्प बसले असते तरी चालले असते. इतके चमत्कार झाले–हादेखील झाला असता ! संस्थानिक भिकारी झाले–भिकारी संस्थानिक झाले. बँका हातात पैसे घेऊन जनतेच्या मागे लागल्या आहेत–हे घ्या पैसे ! अरे हिंमतलाल तमें शूं बोलू शू ? गादी सलामत तो मोटरगाडियाँ पचास. पचास हजारसुद्धा. वर्षाला !

असे विचार मनात आले की पुनः धीर येतो, पुनः सुटतो अशी सारखी कालवा-कालव सुरू आहे. परंतु आशा खुणावत रहाते. संजीवराजे यांची जनता गाडी दाराशी उभी आहे असे दृश्य तरळू लागते–

पों–पों–पों–पों ! मोटार गाडी
लोट धुळीचा हवेत काढी
पळती झाडे पाहू या ऽऽ
संजीवच्या गावाला जाऊ या...
पों ऽऽ पों ऽऽ पों ऽऽऽ ।।

□ □ □

[ खुलासा : १९ सप्टेंबर १९७० च्या अंकातील मुक्ताफळे या सदरात ज्या फत्तेसिंगराव गायकवाड यांच्या पत्नीचे पत्र उधृत केले आहे, ते संस्थानिक ९ जाने. १७९० मध्ये निधन पावले. १९७० साली असले काहीही झालेले नाही. चूक माझी की छापखान्याची ? – ग्यानबा ]

छापखान्याची. क्षमस्व. – संपादक

वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने–

# तरुण पिढीतील असंतोष

जिव्हाळ्याच्या सामाजिक विषयांवर युवकांमध्ये विचारमंथनास उत्तेजन देण्याच्या हेतूने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याची योजना पुण्यातील शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाने आखलेली आहे. या उपक्रमातील पहिली वक्तृत्व स्पर्धा ३० ऑगस्ट १९७० रोजी घेण्यात आली. स्पर्धेसाठी 'तरुण पिढीतील असंतोष' हा व्यापक विषय एक महिना आधी जाहीर केला होता. विद्यार्थ्यांनी भाषण पाठ करून बोलण्याचे ऐवजी स्वतंत्र-पणे आपले विचार मांडण्यास त्यांना उत्तेजन मिळावे यासाठी स्पर्धेच्या वेळी वरील व्यापक विषयातील पोटविषय दिले जातील व त्यातील कोणत्याही एका विषयावर स्पर्धकाने बोलावे असे ह्या स्पर्धेचे स्वरूप आधी जाहीर केले होते. स्पर्धेच्या वेळी पुढील पाच पोटविषय देण्यात आले.

१ : तरुण पिढीतील असंतोष हा भारतापुरता मर्यादित नसून जागतिक तरुणांच्या असंतोषाचे ते अंग आहे काय ?

२ : भारतीय शिक्षणव्यवस्था तरुण पिढीतील असंतोषाला जबाबदार आहे काय ?

३ : तरुणातील असंतोषाचा इतरत्र उद्रेक होत असता महाराष्ट्रातील तरुण शांत कसा ?

४ : शिक्षणसंस्थांच्या शैक्षणिक व्यवस्थापनामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी केल्याने असंतोष कमी होईल काय ?

५ : नक्षलवादी चळवळीकडे तरुण का वळत आहे ?

स्पर्धेमध्ये पुण्यातील दहा महाविद्यालयांनी प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचे संघ पाठ-विले होते. बहुसंख्य स्पर्धकांनी 'भारतीय शिक्षणव्यवस्था तरुण पिढीतील असंतोषाला

जबाबदार आहे काय ?' हा विषय निवडला. सर्वच स्पर्धकांनी प्रचलित शिक्षण-व्यवस्थेवर टीकास्त्र सोडले. कारणमीमांसा करताना निरनिराळ्या मुद्द्यांवर भर दिलेला आढळला, तरी पुढील तीन मुद्दे अनेकांनी उपस्थित केले. १ : शिक्षण-पद्धतीमध्ये योजनेचा अभाव. २ : शिक्षणपद्धतीस योग्य दिशा देण्याच्या दृष्टीने आवश्यक अशा मूल्यांचा अभाव. ३ : शिक्षणसंस्थांच्या स्वायत्ततेवर राजकारणाचा दबाव आणि कारभारात लाचलुचपत व वशिलेबाजी यांचा प्रादुर्भाव.

शिक्षणाची व राष्ट्रीय नियोजनाची सांगड घातली गेली नसल्यामुळे आज तंत्रज्ञ फार मोठ्या संख्येने बेकार आहेत, या गोष्टीकडे अनेक स्पर्धकांनी लक्ष वेधले. परंतु आश्चर्य असे की अन्य पदवीधर सुशिक्षितांतील बेकारीच्या गंभीर प्रश्नाचा मात्र उहापोह झाला नाही.

शिक्षणव्यवस्थेतील बदलाचा पुरस्कार करताना असा बदल केवळ शिक्षण-व्यवस्थेपुरता मर्यादित स्वरूपाचा असू शकणार नाही तर तो सर्वसमावेशक असणे अगत्याचे आहे ही गोष्ट स्पर्धकांच्या नजरेतून निसटलेली दिसली. बेकारीचा प्रश्न सोडवावयाचा झाल्यास केवळ शिक्षण व्यवस्थेची पुनर्रचना करून भागणार नाही तर आर्थिक व सामाजिक व्यवस्थेची पुनर्रचना करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला समाजोपयोगी आणि व्यक्तिविकासोन्मुख असे काम उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. परंतु 'प्रत्येक व्यक्तीस काम' हा मूलभूत मानवी हक्क भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट केला गेलेला नाही. ही जबाब-दारी जोपर्यंत आपल्या अर्थव्यवस्थेत मान्य केली जात नाही तोपर्यंत कामधंदे काही वर्गांच्या आर्थिक निर्णयानुसार आणि फायद्यानुसार उपलब्ध होणार तर शिक्षणाचे तारू स्वतंत्रपणे भरकटत रहाणार अशीच दुरवस्था प्रत्ययास येईल.

आजची शिक्षणपद्धती ब्रिटिशांनी कारकुनांची फौज निर्माण करण्यासाठी आखली आणि तो वारसा आपण आंधळेपणाने तसाच चालू ठेवल्याने बदलत्या परिस्थितीत ती कालबाह्य ठरत आहे. आजच्या जीवनास ती स्पर्श करीत नाही आणि आजच्या गरजा ती भागवू शकत नाही. अशा शिक्षणसंस्था म्हणजे केवळ पदवीधर बनविण्याचे कारखानेच होत. परिणामी शिक्षणाची किंमत कमी होत आहे आणि दर्जा खालावत आहे अशी भीती अनेकांनी व्यक्त केली.

आजची सार्वत्रिक शिक्षणाची गरज आणि त्याबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्यातील सर्जनशीलतेची जोपासना करण्याची निकड ही दोन्ही उद्दिष्टे समोर ठेवून प्रत्यक्षात मात्र त्यापैकी कोणतेच उद्दिष्ट साधत नाही अशी आज शिक्षण व्यवस्थेची अवस्था झालेली आहे. त्यामुळे स्पर्धकांनी शिक्षणाच्या ध्येयधोरणाबद्दल असमाधान व्यक्त केले. परंतु नेमके कोठे चुकत आहे हे दाखविणे त्यांना जमले नाही. वास्तविक व्यक्तिविकासासाठी आणि सामाजिक प्रगतीसाठी शिक्षण हे तत्त्व लक्षात घेऊन शिक्षण-पद्धतीची चिकित्सा व्हावयास हवी. परंतु समाजरचना कशी असावी आणि समाज

घटक म्हणून व्यक्तीचा विकास कशा पद्धतीने शिक्षणाद्वारे करावयास पाहिजे ह्याबद्दल विचारवंतांनाही स्पष्ट कल्पना नाही. आणि गेल्या १५–२० वर्षात भारतामध्ये शैक्षणिक क्षेत्रात मूलभूत चिंतनही पुरेसे झालेलें नाही. शिक्षणपद्धती संबंधीच्या वादविवादातील दिशाशून्यता आणि मूलभूत संभ्रम ह्या वैचारिक पोकळीचेच द्योतक होते.

शिक्षणसंस्थातील राजकीय हस्तक्षेपाविरुद्ध अनेक स्पर्धकांनी जोराचा आवाज उठविला. वशिलेबाजी, लाचलुचपत याची कीड शिक्षण संस्थांनाही पोहोचल्याने गुणवत्तेस वाव मिळण्याची शाश्वती रहात नाही. आणि शिक्षणाचा दर्जा टिकू शकत नाही. शिक्षक विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करू शकत नाही या वातावरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैफल्य निर्माण होत आहे याबद्दल अनेक स्पर्धकांनी खेद व्यक्त केला. सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे गुणवत्तेस योग्य तो वाव मिळत नाही, गरिबांना शिक्षणाची संधीही मिळत नाही याकडे काही स्पर्धकांनी लक्ष वेधले.

'तरुण पिढीतील असंतोष हा भारतापुरता मर्यादित नसून जागतिक तरुणांच्या असंतोषाचे ते अंग आहे काय?' या विषयावर काही विद्यार्थी बोलले. जागतिक असंतोषाचे मूळ दोन पिढीमधील अंतरामध्ये आहे. विशेषतः आज शास्त्रीय व तांत्रिक प्रगती फार वेगाने होत आहे आणि त्यामुळे समस्यांचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे, परंतु या प्रक्रियेमध्ये तरुणांच्या मताची दखल घेतली जात नाही. त्यामुळे हिप्पीसारखे पंथ वाढीस लागले आहेत. जुनी मोडकळीस आलेली व्यवस्था फेकून देऊन आज नवीन ध्येये गाठावयाची आहेत आणि आजची अशांतता ही नवनिर्मितीची नांदीच आहे असे मत काहींनी मांडले. पूर्वापार चालत आलेली स्थिर




कुटुंबव्यवस्था आणि त्यातील आत्मीयता दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात लुप्त झाल्याने तरुणांमध्ये अस्वस्थता निर्माण होत आहे असे एका स्पर्धकाने सुचविले. तरुण पिढीतील असंतोषाच्या जागतिक प्रक्रियेचे विश्लेषण करीत असताना विकसित आणि विकासमग्न देशांमधील असंतोषातील मूलभूत फरक वक्त्यांनी स्पष्ट केला नाही. आज फ्रान्स-इंग्लंडसारख्या विकसित देशातील तरुण त्यास शिक्षणाच्या व्यवस्थापनेत स्थान मिळावे, विविध पातळीवरील सामाजिक व आर्थिक निर्णयामध्ये त्याला सहभागी होता यावे यासाठी चळवळ करीत आहे. म्हणजेच या चळवळीमागे परात्मभावाची जाण ही प्रामुख्याने आहे. भारतासारख्या विकासमग्न देशामध्ये मात्र असंतोषाचे मूळ हे आर्थिक अनिश्चितता व अस्थिरता यामध्ये सापडते.


'नक्षलवादी चळवळीकडे तरुण का वळत आहे' हा विषय काहींनी भाषणासाठी निवडला होता. आजची सामाजिक व आर्थिक विषमता आणि त्याबाबतची सरकारची बेपर्वाई यामुळे नक्षलवादी चळवळ मूळ धरत आहे. जोतेदार कुळांना लुबाडीत आहे, कारखानदार मजुरांची पिळवणूक करीत आहेत, अशा अन्याय्य समाजरचनेविरुद्ध सनदशीर मार्गाने उपाय चालत नाही असे आढळल्याने तरुण वर्ग आज जहाल विचारसरणीकडे वळत आहे. हिंसक मार्गाने जाणे योग्य नाही असे म्हणूनही आज परिस्थितीमुळे ते मार्ग स्वीकारणे भाग पडत आहे असे मत एका स्पर्धकाने मांडले.

प्रचलित शिक्षणपद्धतीबद्दल स्पर्धकात असमाधान दिसून आले. ह्या परिस्थितीत काही तरी बदल होणे आवश्यक आहे अशी इच्छाही त्यांपैकी बऱ्याच जणांनी व्यक्त केली. असा बदल होऊन नेमके काय घडावयास पाहिजे ह्याची स्पष्ट कल्पना त्यांना नसली तरी ज्या समाजामध्ये तरुणांच्या युयुत्सू वृत्तीला वाव मिळेल, गुणांची कदर केली जाईल असा समाज निर्माण झाला पाहिजे असे स्वप्न ह्या तरुण मुलांच्या डोळ्यासमोर तरळताना दिसत होते. परंतु त्यांच्या डोळ्यासमोर तरळणाऱ्या नवसमाजनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये प्रस्थापितात कशा तऱ्हेचा बदल अभिप्रेत आहे आणि त्यासाठी त्यांचेकडून किती श्रम व त्याग आवश्यक आहेत ह्याची जाण त्यांना दिसत नव्हती. समाजपरिवर्तनाचा अर्थ आणि समाजपरिवर्तनाचे शास्त्र त्यांना उमगलेले दिसत नव्हते. तरुण पिढीतील ही वैचारिक त्रुटी पहाता असे निश्चितपणे वाटते की आजच्या तरुण पिढीच्या चिंतनाला जर प्रगत तात्त्विक अधिष्ठान मिळाले नाही आणि नवसमाजनिर्मितीसाठी प्रस्थापितांशी निकराची झुंज देण्याची ताकद तरुणांमध्ये निर्माण झाली नाही तर तरुणांतील असंतोष वांझोटा ठरेल.

कार्यवाह

□ □ □

# पराजित – अपराजित



**वि. स. वाळिंबे** **लेखांक : अठरा**

हिटलरची पावले अगदी पद्धतशीरपणे पडत होती.

चेकोस्लोव्हाकियावर मर्मभेदक प्रहार केल्यानंतर या नाझी लष्करशहाची प्रक्षुब्ध नजर पोलंडवर रोखली जाणार यात मुळीच शंका नव्हती. सारीपट मांडलेला असावा आणि एखाद्या सराईत खेळाडूने प्रतिपक्षाची जागोजाग कोंडी केलेली असावी – इतक्या सफाईने हिटलर आपले फासे टाकत होता.

यातला एक फासा आपला जीव घ्यायला कारणीभूत ठरणार आहे हे पोलंडला त्यावेळी उमगले नाही. पोलिश लोक शूर खरे; पण राजकारणातील अशुद्ध अन् अवघड आडाखे ध्यानात घेण्याच्या बाबतीत ते सतत बेफिकीर राहिलेले आहेत. वस्तुतः पोलंडने जेवढे दुर्दैवाचे दशावतार पाहिलेले आहेत, विटंबनेचे जितके हलाहल पचविले आहे तेवढे आणि तितके क्रूर दैव युरोपमधील दुसऱ्या कोणत्याच देशाला अनुभवावे लागलेले नाही. त्यामुळेच की काय, विजयापेक्षा विनाशाला सामोरे जात असताना पोलिश नागरिकांना चमत्कारिक समाधान वाटते.

दीडशे वर्षे हा देश जर्मनी, रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्यात तिभंगला होता. पहिले महायुद्ध संपल्यानंतर विजेत्या राष्ट्रांनी युरोपच्या नकाशाची नवी मांडामांड केली तेव्हा कोठे पोलंडचा पुनर्जन्म झाला. या महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मनीचा सूड उगविण्यासाठी व्हर्सायच्या करारात अनेक तरतुदी करण्यात आल्या. जर्मन लष्करवादाचे जन्मस्थान असलेला पूर्व प्रशिया जर्मन भूमीपासून अलग पाडण्यासाठी या करारान्वये पोलंडला बाल्टिक समुद्रापर्यंत एक पट्टा देण्यात आला. त्याचप्रमाणे त्या समुद्रावरचे डॅन्झिग बंदर जर्मनीपासून छिनावून घेऊन त्याला स्वतंत्र नगर-राज्याचा दर्जा बहाल करण्यात आला. जर्मनीची जाणूनबुजून मानहानी करण्यासाठीच हा सारा खटाटोप करण्यात आला होता.

त्यामुळे पोलंडचे नाव निघाले की जर्मन माणूस संतापून उठे. हिटलरचा उदय होण्यापूर्वीचा, वायमार प्रजासत्ताकाच्या काळातील दुबळा जर्मनीही या बाबतीत किती दुखावलेला होता हे त्यावेळच्या जर्मन सरसेनानीच्या उद्गारांवरून प्रतीत होते १९२२ मध्ये जनरल हॅन्स फॉन सेक्ट म्हणाला होता, ' जर्मनीला जर आपलं अस्तित्व अबाधित राखायचं असेल तर पोलंडचं अस्तित्व त्यानं सहन करता कामा नये. रशियालाही पोलंडचं अस्तित्व सहन होत नाही. म्हणून आपण रशियाच्या मदतीनं पोलंडचा विनाश केला पाहिजे. आपल्या परराष्ट्रीय धोरणाचं तेच मुख्य सूत्र असायला हवं. '

पोलंडबाबत जे जर्मनीला वाटत होते तेच कम्युनिस्ट रशियाला वाटत होते. कारण १९२०–२१ मधल्या रशिया-पोलंड युद्धाची समाप्ती घडवून आणताना पोलंडने आपली पूर्व सीमा जुन्या कर्झन रेषेच्या अलीकडे आपल्या प्रदेशामध्ये दीडशे मैल आत आणून ठेवलेली आहे. ही गोष्ट आंतरराष्ट्रीयवादाचा दावा करणारे बोल्शेव्हिक राज्यकर्ते विसरले नव्हते. स्वतंत्र पोलंडचे अस्तित्व झारशाही-तील रशियालाच खुपत होते असे नव्हे, पोलंडचे खच्चीकरण करायला कम्युनिस्ट रशियाही आसुसला होता.

आपल्या पश्चिम आणि पूर्व सीमेनजीकचे हे दोन महाकाय शेजारी आपल्या-संबंधी कोणती भावना बाळगून आहेत हे पोलंडला कळायला हवे होते आणि त्यादृष्टीने त्याने आपल्या परराष्ट्रीय करार-मदारांची आखणी करायला हवी होती, या दोन शेजाऱ्यांच्या हालचालीबद्दल जागरूक असायला हवे होते.

पण तसे घडले नाही.

केवळ पोलंडच परिस्थितीचे भान विसरला होता असे नव्हे; ब्रिटन आणि फ्रान्स यांनाही आपण यावेळी नेमके काय केले पाहिजे याचा उलगडा झाला नाही.

मुख्य म्हणजे हिटलर आणि स्टॅलिन या दोन हुकूमशहांना जवळ आणायला पोलंड कारणीभूत ठरणार आहे हे अँग्लो-फ्रेंच नेतृत्वाने ध्यानातच घेतले नाही.

तसे पाहिले तर फ्रान्स आणि पोलंड यांचे संबंध पहिल्या महायुद्धानंतरच्या रूसो-पोलिश युद्धापासून दृढ झाले होते. १९२० च्या मेमध्ये पोलिश सैन्याने किएव्ह ही युक्रेनची राजधानी जिंकून रशियाला चांगलाच तडाखा दिला होता. त्यानंतर मात्र लढाईचे पारडे फिरले आणि अवघ्या दोन महिन्यांच्या आत रशियन सेनेने प्रतिचढाई सुरू केली. वॉर्सा हे राजधानीचे शहर हातातून घालवावे लागते की काय अशी पोलंडला भीती वाटू लागली. यावेळी जनरल वेगान्द हा फ्रेंच सेनानी पोलंडच्या मदतीला धावून गेला आणि त्यामुळेच पोलंडची अब्रू वाचली. यावेळी कॅप्टन चार्लस् द गॉल या तरुण अन् तडफदार सेनानीनें असा काही पराक्रम केला की पोलिश नेत्यांनी त्याला लष्करी सन्मान बहाल केला. इतकेच नव्हे तर असा हा तडफदार सेनाधिकारी आपल्या देशात रहावा म्हणून त्यांनी वॉर्सा येथे नव्यानेच सुरू झालेल्या सैनिकी महाविद्यालयामध्ये प्राध्यापकपद स्वीकारण्याची द गॉल याला विनंती केली. अर्थात फ्रान्सच्या गौरवासाठी आपण लढत आहोत या भावनेने झपाटलेल्या द गॉल याने तो आग्रह जुमानला नाही हे वेगळे.

रूसो-पोलिश युद्ध संपल्यानंतरही फ्रान्स आणि पोलंड यांच्यातील परस्पर-मदतीचा करार अबाधित ठेवण्याची दक्षता दोन्ही राष्ट्रांनीही घेतली होती आणि सत्तेवर आल्यापासून हिटलरला हीच गोष्ट सलत होती.

पोलंड फ्रान्सपासून दुरावला तरच आपण त्याला हात लावू शकू हे हिटलरला माहीत होते. म्हणून त्याने पोलिश नेत्यांशी मानभावी बोलणी सुरू केली. हिटलरचे व्यक्तिमत्त्व अन् वक्तृत्व असे होते की त्यामुळे त्याला भेटायला येणारा प्रत्येकजण पहिल्या भेटीतच भारावून जाई आणि हिटलरचे गोडवे गातच तो बाहेर पडे. पोलिश नेत्यांनीही तीच गत झाली. १९३४ च्या जानेवारीमध्ये जर्मनी आणि पोलंड यांच्यात अनाक्रमणाचा करार झाला. यापुढे हिटलरपासून आपल्याला भीती बाळगायचे कारण नाही अशा निश्चित मनःस्थितीत पोलंड वावरू लागले. जर्मनी आणि पोलंड यांच्यात मतभेद निर्माण झाला तर तो त्यांनीच आपापसात वाटा-घाटी करून सोडवावा, तिऱ्हाईताला त्यात हस्तक्षेप करू देता कामा नये असे एक कलमच अनाक्रमणाच्या करारात हिटलरने मुद्दामच अंतर्भूत केले होते. त्यामुळे हा करार म्हणजे हिटलरच्या मुत्सद्देगिरीचा विजय ठरला.

हा करार करून आपण आत्मनाशाला निमंत्रण देत आहोत हे पोलंडला उमगले नाही.

कारण जोपर्यंत स्वतंत्र डॅन्झिग बंदर आणि त्याला जोडणारा व पूर्व प्रशियाला अलग पाडणारा पट्टा अस्तित्वात आहे तोपर्यंत जर्मनी आणि पोलंड यांच्या दरम्यान मैत्रीचे संबंध निर्माण होणे शक्य नाही ही गोष्ट स्पष्ट होती; परंतु तरीही पोलंडशी अनाक्रमणाचा करार करण्यात हिटलरने पुढाकार घेतला. कारण या करारान्वये कोणत्याही संघर्षासंबंधी पोलंड आणि जर्मनी यांच्यातच वाटाघाटी होणार असल्यामुळे

पोलंडबाबत राष्ट्रसंघाची पर्वा करण्याची हिटलरला आता गरज उरणार नव्हती. म्हणजे राष्ट्रसंघ ज्या सामुदायिक सुरक्षिततेचा पुकारा करीत होता तो पोलंड पुरता तरी निरर्थक ठरला होता. त्याचप्रमाणे फ्रान्सपासून पोलंडला वेगळे पाडण्याची हिटलरची आकांक्षाही सफल झाली होती.

हा करार घडवून आणण्यासाठी हिटलरला पोलंडचा परराष्ट्रमंत्री कर्नल जोसेफ बेक याच्या फ्रान्स-विरोधी मनोवृत्तीचा चांगलाच फायदा झाला. काही वर्षापूर्वी पॅरिसमधल्या पोलिश वकिलातीमध्ये बेक काम करीत असताना फ्रान्सचे गुप्त लष्करी कागदपत्र चोरण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून त्याला फ्रान्समधून हाकलून देण्यात आले होते. तेव्हापासून बेकच्या मनात फ्रान्ससंबंधी राग होता. त्यामुळे हिटलरने अनाक्रमणाच्या कराराचे बोलणे सुरू करताच बेकने आपण होऊन त्याला होकार भरला.

एखाद्या देशाबद्दलचे आपले पूर्वग्रह राष्ट्रहिताच्या आड येऊ देता कामा नयेत एवढा विवेक बेकला त्यावेळी उरला नव्हता. नेत्यांचे हे असले हट्ट राष्ट्राला फार महाग पडतात हे पोलंडला लवकरच कळून येणार होते.

एकोणतीस सप्टेंबरच्या रात्री चेंबर्लेन आणि दलादिए यांनी म्युनिक-करारावर स्वाक्षऱ्या करताच, हिटलरच्या आदेशानुसार बेकने चेकोस्लोव्हाकियाकडे खलिता धाडला—' तेशेन आमचा आहे, तो ताबडतोब आम्हाला परत मिळाला पाहिजे.' तेशेन हा इतका लहानसा प्रदेश होता की त्यासाठी चेकोस्लोव्हाकियाशी भांडण उकरून काढण्याचे पोलंडला काहीच कारण नव्हते. परंतु चेकोस्लोव्हाकियाची जेवढी मानहानी होईल तेवढी हिटलरला हवी होती आणि त्यासाठीच त्याने बेकला तो खलिता धाडायला प्रवृत्त केले होते. बेक एवढ्यावरच थांबला नाही. चेकोस्लो-व्हाकियाच्या उत्तराची वाट पाहण्यापूर्वीच पोलिश सेना तेशेनमध्ये घुसल्या होत्या.

म्युनिक करार झाल्यानंतर पाच-साडेपाच महिने हिटलर मुद्दामच गप्प बसला. सुडेटनलँड मिळाल्यामुळे आपण आता शांत झालेलो आहोत अशी त्याला ब्रिटन-फ्रान्सची कल्पना करून द्यायची होती. ही दोन लोकसत्ताक राष्ट्रे आपल्या-बाबत जितकी बेफिकीर राहतील तितक्या प्रमाणात हिटलरचे पुढचे बेत लवकर सिद्धीला जाणार होते. मधल्या काळातील हिटलरच्या या मुग्धतेमुळे, म्युनिक-करार करून आपल्या नेत्यांनी फार मोठी कामगिरी पार पाडली आहे याबद्दल ब्रिटिश आणि फ्रेंच जनतेची खात्रीच पटली.

आणि त्यानंतर लगेच हिटलरने पुन्हा एकदा आपले मूळ स्वरूप प्रकट केले.

अगदी अनपेक्षितपणे त्याने १४ मार्च १९३९ या दिवशी स्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. स्लोव्हाकिया, बोहेमिया आणि मोराव्हिया या तीन प्रदेशांचे मिळून चेकोस्लोव्हाकिया हे राष्ट्र आकाराला आले होते. त्यापैकी

स्लोव्हाकिया हा यापुढे स्वतंत्र देश म्हणून ओळखला जाईल असे हिटलरने जाहीर करताच चेकोस्लोव्हाकियाच्या अस्तित्वाला काहीच अर्थ उरणार नव्हता. त्यामुळे हिटलरची ही घोषणा ऐकताच चेकोस्लोकियाचा वृद्ध अध्यक्ष एमिल हाचा लागलीच बर्लिनला आला. हिटलरला भेटताना त्याचे सारे शरीर थरकापत होते. काय बोलावे हेदेखील त्याला सुचेनासे झाले. त्या भेदरलेल्या राष्ट्राध्यक्षाला हिटलर म्हणाला, "मला तुमचं काही एक ऐकायचं नाही. माझी ही योजना तुम्ही बऱ्या बोलानं मान्य केली तर ठीक; नाही तर बाँबवर्षाव करून दोन तासांच्या आत तुमचं प्राग बेचिराख करून टाकीन. त्याचप्रमाणे आमच्या लष्कराला बोहेमिया आणि मोराव्हिया यांचाही ताबा घ्यावा लागेल. तसं काही घडू नये असं वाटत असेल तर बोहेमिया आणि मोराव्हिया यांना जर्मनीनं आपल्या संरक्षणाखाली घ्यावं अशी तुम्ही मला इथं, आताच्या आता विनंती केली पाहिजे."

हाचा स्लोव्हाकियासंबंधी अजीजी करायला आला होता. त्याऐवजी बोहेमिया आणि मोराव्हिया यांचेही हिटलरला दान करण्याची त्याच्यावर पाळी आली. थरथरणाऱ्या मानेनेच त्याने हिटलरला होकार दिला. दुसऱ्या दिवशी म्हणजे पंधरा मार्चला जर्मन सैन्य प्रागमध्ये घुसले. चेकोस्लोव्हाकिया हे आता हिटलरचे मांडलिक राष्ट्र झाले होते. हा विजयोत्सव साजरा करण्यासाठी हिटलर स्वतः प्रागमध्ये गेला आणि चेक जनतेला उद्देशून म्हणाला, "तुमचं संरक्षण करण्याची जबाबदारी तुमच्या नेत्यांनी माझ्यावर सोपविली आहे. तुम्हाला आता कशाचंही भय बाळगायचं कारण नाही."

खरेच होते ते! चेकोस्लोव्हाकियाला आता कोणाचेच भय बाळगण्याचे कारण नव्हते. कारण त्याच्या अस्तित्वालाच आता अर्थ उरला नव्हता. 'युरोपच्या नकाशावरून मी चेकोस्लोव्हाकियाचं नाव पुसून टाकीन' ही आपली गर्जना नाझी हुकूमशहाने खरी करून दाखविली होती – विश्वासघात आणि दमदाटी यांच्या बळावर!

एक असहाय देश हिटलरच्या लष्करी टाचांखाली चिरडला जात असताना, दुबळे निषेध–खलिते धाडण्यापलीकडे ब्रिटन आणि फ्रान्स यांनी काहीही केले नाही.

बोहेमिया आणि मोराव्हिया यांच्या पाठोपाठ 'स्वतंत्र' स्लोव्हाकियानेही 'आम्हाला तुमच्या संरक्षणाखाली घ्या' अशी हिटलरला तारेने 'विनंती' केली. या तारेचा मसुदाही हिटलरनेच तयार केला होता आणि 'त्यानुसार तुम्ही मला तार करा' अशी त्याने स्लोव्हाक नेत्यांना, ते बर्लिनला आलेले असताना धमकी दिली होती. त्याप्रमाणे ती तार येताच जर्मन सैन्य स्लोव्हाकियामध्ये जाऊन पोचले. तत्पूर्वी हिटलरने स्लोव्हाकियाचा रुथेनिया हा पूर्वेकडील प्रांत हंगेरीला देऊन टाकला होता.

चेकोस्लोव्हाकियाचे हे असे क्रूर लचके तोडले जात असताना, हा सारा प्रकार

पोलिश नेते शांतपणानें पहात होते. आपण हिटलरच्या कात्रीत सापडले जात आहोत, एक पूर्व सीमा सोडली तर इतर तिन्ही सीमांवर नाझी सैनिक बंदुका रोखून उभे आहेत याची पोलंडला जाणीव झाली नाही.

चेकोस्लोव्हाकियाबाबत हिटलरने आपल्याला हातोहात बनविले हे पाहून चेंबर्लेन आणि दलादिए थरकले. 'सुडेटनलँड मिळाल्यानंतर मी आणखी काहीही मागणार नाही' असे म्युनिक-करारावर स्वाक्षरी करताना हिटलरने या दोघांना तोंड भरून आश्वासन दिले होते. हिटलरचे हे बोलणे काही खरे नाही हे त्यावेळी दलादिए याला पक्के ठाऊक होते. तसे त्याने चेंबर्लेनला बजावले होतेही. पण दलादिएची मजल त्याच्यापुढे जाऊ शकली नाही. चेंबर्लेन जर आपले ऐकत नसेल तर आपण फ्रान्सच्या हिताशी सुसंवादी ठरणारे वेगळे धोरण आखावे आणि ते निर्धाराने कार्यवाहीत आणावे एवढी धमक दलादिएजवळ नव्हती.

त्यापायीच तर फ्रान्सची ही अशी फरफट होत होती.

दलादिएला वळत नसले तरी कळत होते; बॉन्नेच्या बाबतीत तर तोही अंधार होता. बॉन्ने म्हणजे चेंबर्लेनची फ्रेंच आवृत्ती होती. त्यामुळे म्युनिक-करारानंतर जसा चेंबर्लेनने हिटलरशी शांततामय सहजीवनाचा करार केला होता तसा फ्रान्सच्या वतीने बॉन्ने यानेही केला होता. या करारावर स्वाक्षरी करण्यासाठी जर्मन परराष्ट्र-मंत्री रिबेन्ट्रॉप ६ डिसेंबर १९३८ या दिवशी मुद्दाम पॅरिसला आला होता. या कराराचा हिटलरच्या दृष्टीने अर्थ स्पष्ट होता. आपल्या पूर्व युरोपातील मुक्त संचाराला फ्रान्सकडून प्रतिरोध होणार नाही याबद्दल हिटलरची आता खात्री पटली होती.

शंभर दिवसांच्या आतच त्याचे प्रत्यंतर आले. चेकोस्लोव्हाकियाच्या मानेभोवती फाशीचा दोर फेकताना हिटलर किंचितही थरकापला नाही. आपण म्युनिक-कराराचा कागद फाडून टाकला तर ब्रिटन आणि फ्रान्स आपल्याविरुद्ध दोनचार शब्द पुटपुटतील, पण त्यापेक्षा अधिक काहीही करणार नाहीत हे या दोन लोकसत्ताक राष्ट्रांच्या नेतृत्वाचे पाणी जोखलेल्या जर्मन हुकूमशहाला पुरेपूर ठाऊक होते.

हे सारे आपल्या दुबळेपणापायी घडले म्हणून दलादिए स्वतःवर खूप चरफडला. आपल्या सहकाऱ्यांशी बोलताना तो म्हणाला, "चेकोस्लोव्हाकियाबाबतचं हिटलरचं वर्तन म्हणजे पाशवी वृत्तीचं बेबंद प्रदर्शन आहे. त्यामुळे म्युनिक-करार आणि फ्रान्स व जर्मनी यांच्यातील शांततामय सहजीवनाचा करार यांना आता काहीही अर्थ उरलेला नाही. गेल्या काही दिवसातील घटनांमुळे परिस्थिती खूपच बदललेली आहे. युरोपमध्ये आपण कसेही वागलो, कोणतंही राष्ट्र नष्ट केलं तरी आपल्याला कोणी रोखू शकत नाही असं हिटलरला वाटू लागलेलं आहे. म्हणून जर का यावेळी आपण निर्धारानं उभं राहिलो नाही तर आतापर्यंत आपल्यावर विसंबून राहिलेली

आपलीं मित्रराष्ट्रं आत्मरक्षणासाठी हिटलरच्या आसऱ्याला जातील आणि तसं घडलं तर पुढे काय होईल हे सांगणं मुळीच अवघड नाही. भोवतालची छोटी राष्ट्रं गिळंकृत केल्यानंतर हिटलरचं पाऊल फ्रान्सच्या रोखाने पडणार आहे. त्यावेळी आपल्या मदतीला कोणीही येणार नाही, ज्यानं मदतीला यावं असा कोणी उरणारच नाही."

चेंबर्लेनलाही हळूहळू जाग यायला लागली होती. १७ मार्च रोजी बर्मिंगहॅम येथे बोलताना तो म्हणाला, "म्युनिक करार लाथाडून हिटलरनं ब्रिटनची फसवणूक केली आहे. यापुढे त्याच्या शब्दावर विश्वास ठेवणं मूर्खपणाचं ठरेल. म्हणून यापुढचं आक्रमण त्याला पचू द्यायचं नाही असं आम्ही ठरविलं आहे."

ब्रिटनच्या परराष्ट्रीय धोरणात एकदम हा जो बदल झाला त्याला इतिहासात जोड सापडणे कठीण आहे असे चर्चिल याने म्हटले आहे. कारण पंधरा दिवसांच्या आत चेंबर्लेन याने युरोपमधील अनेक छोटया राष्ट्रांना सहाय्याचे अभिवचन दिले. पोलंडचा चेकोस्लोव्हाकिया होऊ देणार नाही असे त्याने एकवीस मार्चला जाहीर केले. त्यानंतर बेल्जम, हॉलंड आणि स्वित्झर्लंड यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेतली. एप्रिलच्या पहिल्या आठवडयात मुसोलिनीने अल्बानिया या छोटेखानी राष्ट्राचा घास गिळताच चेंबर्लेनने ग्रीस आणि रुमेनिया यांच्याशी मदतीचे करार केले, तुर्कस्तानलाही सहाय्याचे आश्वासन दिले. या प्रत्येक करारात फ्रान्सही सहभागी झाला होता.

आश्वासनांची ही अशी खैरात करणे सोपे होते. परंतु ती पाळण्याची आपल्या अंगात कुवत आहे की नाही हे मात्र ब्रिटन आणि फ्रान्स यांना सांगणे कठीण होते. कारण गेल्या दोन तीन वर्षाच्या काळात हिटलरने आपल्या लष्करी तयारीचा वेग कमालीचा वाढविला होता. विमाने आणि रणगाडे यांच्या उत्पादनाला जर्मनीत उधाण आले होते. तरुणवर्ग मोठ्या संख्येने सैन्यात दाखल होत होता. ब्रिटन आणि फ्रान्स यांची–विशेषतः फ्रान्सची स्थिती अगदी उलट होती. युद्ध टाळले पाहिजे या आग्रहापायी फ्रेंच सेनानी लष्करी सिद्धतेबाबत गलथानपणे वागत होते. आपण हिटलरशी मुकाबला करू शकणार नाही याबद्दल त्यांची लढण्यापूर्वीच खात्री झालेली होती आणि लढू शकणार नाही तर लढण्याची तयारी तरी कशाला करायची असा उलट प्रश्न तेच विचारीत होते.

हिटलरने चेकोस्लोव्हाकिया हा हा म्हणता गिळंकृत करावा हे पाहून स्टॅलिन अस्वस्थ झाला. आता तरी युरोपीय राष्ट्रांनी हिटलर-विरोधी फळी उभारली पाहिजे असे त्याला वाटू लागले. म्हणून त्याने अठरा मार्चला आपला परराष्ट्रमंत्री लिटव्हिनॉव्ह याच्या मार्फत चेंबर्लेन आणि दलदिए यांना पत्र लिहिले–'हिटलर-विरुद्ध आघाडी उघडण्यासाठी ब्रिटन, पोलंड, रशिया, फ्रान्स, रुमेनिया आणि तुर्कस्तान या सहा राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बुखारेस्ट येथे बैठक बोलविण्यात यावी असे आम्हाला वाटते.'

हिटलरने वर्षापूर्वी ऑस्ट्रिया गिळंकृत केला तेव्हाही लिटव्हिनॉव्ह याने अशीच सूचना केली होती. चेकोस्लोव्हाकियाच्या बलिदानानंतर त्याने आपल्या या सूचनेचा पुनरुच्चार केला; परंतु मागच्या वेळेप्रमाणे या वेळेलाही या सूचनेबाबत ब्रिटन आणि फ्रान्स यांनी मुळीच उत्साह दाखविला नाही.

पोलंडचा आत्मघातक हटवाद अद्यापही कायम होता.

पोलिश परराष्ट्रमंत्री कर्नल बेक याने जाहीर केले–' रशियाशी लष्करी मदतीचा करार करायला पोलंड कधीच संमती देणार नाही. कारण रशियाच्या उद्दिष्टा-बद्दल बेक याला शंका वाटत होती. आपल्या संरक्षणाचे निमित्त सांगून रशिया आपल्यावर लष्करी वर्चस्व प्रस्थापित करण्याची संधी साधू पहात आहे असे बेक याला वाटत होते. शिवाय हिटलरच्या आक्रमणाला रोखण्याची रशियामध्ये ताकद आहे याबद्दल तो साशंक होता. पोलंडचा विरोध पाहताच, लिटव्हिनॉव्हच्या सूचने-बद्दलचा चेंबर्लेन आणि बॉन्ने यांचा उरलासुरला उत्साहही मावळला.

हिटलरविरोधी साखळीत रशियाला सहभागी करून घेण्याची आणखी एक संधी ब्रिटन आणि फ्रान्स यांनी गमावली.

जवळजवळ महिनाभराने ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॉर्ड हॅलिफॅक्स याने लिटव्हि-नॉव्हला पत्र लिहिले–' पोलंड किंवा रुमेनिया यापैकी कोणावरही आक्रमण झाले, तर आपण त्याच्या मदतीला येऊ असे रशियाने जाहीर करावे.' बॉन्ने यांची सूचना थोडीशी वेगळ्या प्रकारची होती. ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यापैकी कोणत्याही एका राष्ट्राचे जर्मनीबरोबर युद्ध जुंपले तर उर्वरित दोन्ही राष्ट्रांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारायचे असा आपण करार करूया असे बॉन्ने याने लिटव्हिनॉव्हला सुचविले. म्हणजे ब्रिटन आणि फ्रान्स यांना रशियाकडून निश्चित मदतीचे आश्वासन हवे होते. परंतु त्यासाठी रशियाला विश्वासात घ्यायला त्यांची तयारी नव्हती. त्यामुळे ही अशी एकतर्फी सूचना रशियाला पसंत पडणे शक्यच नव्हते.

लिटव्हिनॉव्हने उत्तर धाडले–' बॉन्ने यांनी सुचविलेला मोघम करार करून काहीच साध्य होणार नाही. आपण आपले किती पायदळ, नौदल आणि वायुदल मित्रराष्ट्रांच्या पाठीशी उभे करणार आहोत याचा स्पष्ट खुलासा या करारात करण्यात आला पाहिजे. पोलंडची इच्छा असेल तर त्यालाही या करारामध्ये सहभागी करून घ्यावे. त्याचप्रमाणे केवळ पोलंड आणि रुमेनिया यांना आश्वासन देऊन भागणार नाही. मध्य आणि पूर्व युरोपमधील सर्व राष्ट्रांना ' आम्ही तुमच्या मदतीला येऊ ' असे आपण अभिवचन दिले पाहिजे आणि हे आश्वासन देण्यापूर्वी ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यांनी आपापल्या लष्करी मदतीचा तपशीलही निश्चित केला पाहिजे.

जर्मनीविरुद्ध युरोपमध्ये ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यांची संयुक्त फळी उभार-ण्याचा लिटव्हिनॉव्ह याचा हा शेवटचा प्रयत्न होता आणि आपला हा प्रयत्न

यशस्वी होईल अशी त्याची कल्पनाही होती. लिटव्हिनॉव्हची ही सूचना चर्चिल याला एकदम पसंत पडली. तो चेंबर्लेनला म्हणाला, 'जर्मनीविरुद्ध पूर्व आघाडी उघडायची असेल तर आपल्याला रशियाची मदत घेतलीच पाहिजे.'

चर्चिलचे हे मत चेंबर्लेनला मान्य झाले नाही. दलादिए याचीही भूमिका काहीशी अशीच होती. परंतु हिटलरला रोखण्याचा अन्य कोणताच पर्याय उपलब्ध नसल्यामुळे फ्रेंच मंत्रिमंडळाने रशियाशी लष्करी कराराबाबत वाटाघाटी करायला संमती दर्शविली. पोलंड आणि रुमेनिया यांना मदत करण्याचे रशिया जोपर्यंत निःसंदिग्ध आश्वासन देत नाही तोपर्यंत आपण त्याच्याशी लष्करी करारासंबंधी वाटाघाटी करू नयेत हे चेंबर्लेन आणि लॉर्ड हॅलिफॅक्स यांचे मत कायम होते.

ब्रिटन आणि फ्रान्स आपल्याला विश्वासात घ्यायला तयार नाहीत हे पाहून स्टॅलिनने आपल्या परराष्ट्रीय धोरणात बदल करण्याचे ठरविले. त्याची पहिली चुणूक तीन मे रोजी दिसून आली. त्यादिवशीच्या 'प्रावदा'च्या अंकात एक महत्त्वाची बातमी शेवटच्या पानावर अगदी मामुली पद्धतीने प्रसिद्ध करण्यात आली होती–'लिटव्हिनॉव्ह यांनी परराष्ट्रमंत्रिपदाचा राजीनामा दिलेला असून त्यांच्या जागी व्हॅशेस्लाव्ह मोलोटोव्ह यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.'

लिटव्हिनॉव्हच्या वडतर्फीचा अर्थ ब्रिटन आणि फ्रान्स यांना चटकन उमगला नाही. बॉन्ने याने तर पॅरिसमधल्या सोव्हिएट राजदूताला विचारले, "मोलोटोव्ह आल्यामुळे रशियाच्या परराष्ट्रीय धोरणात काही बदल होणार आहे काय?"

"छे, तसं व्हायचं काही कारण नाही."

सोव्हिएट राजदूताच्या या उत्तराने बॉन्ने याचे समाधान झाले.

रॉबर्ट कोलोन्द्र या फ्रेंच राजदूताची आता बर्लिनला बदली झालेली होती. परंतु त्यापूर्वी तो अनेक वर्षे मॉस्कोमध्ये काम करीत असल्यामुळे रशियाच्या राजकारणाची त्याला बरीच माहिती होती. परंतु यावेळी त्याचीही फसगत झाली. बर्लिनमधल्या रशियन प्रतिनिधींशी झालेल्या बोलण्याचा वृत्तान्त परराष्ट्रमंत्री बॉन्ने याला कळविताना कोलोन्द्र याने लिहिले–"मोलोटोव्हच्या नेमणुकीमुळे ब्रिटन आणि फ्रान्स यांनी चिंताक्रांत व्हायचं मुळीच कारण नाही. उलट मोलोटोव्हवर स्टॅलिनचा कमालीचा विश्वास असल्यामुळे मोलोटोव्हच्या कारकिर्दीत रशियाचं धोरण अधिक सूत्रबद्ध आणि काटेकोर होईल आणि तसं होणं आपल्या दृष्टीने हितावहच आहे. रशियाचे धोरण पहिल्यापेक्षा अधिक निःसंदिग्ध होतं किंवा नाही हे समजायला आणखी थोडा काळ आपण थांबलं पाहिजे."

आपला हा अंदाज किती चुकीचा आहे हे कळून घेण्यासाठी कोलोन्द्र याला फार काळ थांबण्याची गरज पडली नाही.

रशियाचे परराष्ट्रीय धोरण निश्चितच बदलले होते, इतकेच नव्हे तर हा बदल हिटलरला कळावा यासाठी स्टॅलिन अधीर झालेला होता. त्यासाठी बर्लिनमधील

रशियन प्रतिनिधी जॉर्जी अॅस्टाखोव याने पाच मे रोजी जर्मन परराष्ट्रखात्यातील एक अधिकारी डॉ. ज्युलिअस इनूर याची मुद्दाम भेट घेतली. रशिया आणि जर्मनी यांनी परस्परांना समजावून घेतले पाहिजे या अॅस्टाखोवच्या उद्‌गारांचा अर्थ समजायला डॉ. श्नूर याला फार वेळ लागला नाही.

तसे पाहिले तर हिटलरशी हातमिळवणी करण्याच्या दृष्टीने स्टॅलिनने हे पहिल्यांदाच पाऊल टाकले होते असे नव्हे. ब्रिटन – फ्रान्सशी लष्करी करार करण्याचा लिटव्हिनॉव्ह कितीही आटापिटा करीत असला तरी त्यात त्याला यश येणार नाही याचा स्टॅलिनला अंदाज आलेला होता. त्यामुळे एकीकडे लिटव्हिनॉव्ह, चेंबर्लेन आणि दलादिए यांना त्रिपक्षीय कराराच्या आवश्यकतेसंबंधी पत्र लिहीत असताना, बर्लिनमधील सोव्हिएट राजदूत अॅलेक्सी मेरेकालेव्ह जर्मन परराष्ट्रसचिव अर्न्स्ट फॉन विझसॅकर याच्याशी रुसो-जर्मन संबंधांबाबत बोलत होता.

मेरेकालेव्ह याने विझसॅकर याला स्पष्टच विचारले, "जर्मन आणि रशिया यांचे संबंध कसे असावेत असं तुम्हाला वाटतं ?"

"रशियाबरोबर प्रथम व्यापारी संबंध प्रस्थापित करावेत अशा मताचा मी आहे. कारण व्यापारी व्यवहारात वैचारिक मतभेद आड येण्याचं काहीच कारण नाही," विझसॅकरने उत्तर दिले.

मेरेकालेव्ह-विझसॅकर भेटीवरून एक गोष्ट स्पष्ट होत होती. लिटव्हिनॉव्हमार्फत ब्रिटन–फ्रान्सशी लष्करी करार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असतानाच, स्टॅलीन हिटलरचे मनोगत जाणून घ्यायचा प्रयत्न करीत होता. अँग्लो–फ्रेंचांना जर आपल्या मैत्रीचे मोल कळले नाही तर एकाकी पडण्यापेक्षा आपण हिटलरशी संगनमत करून आपले उद्दिष्ट साध्य करून घ्यावे हा विचार डोळ्यापुढे ठेवूनच स्टॅलिनच्या हालचाली होत होत्या.

स्टॅलिन जर हा असा दुटप्पी खेळ खेळत असेल तर तोच खेळ खेळायला हिटलरला संकोच वाटायचे काहीच कारण नव्हते. स्टॅलिनइतकाच तोही या खेळात निष्णात होता. फ्रान्स आणि ब्रिटन यांच्यापासून रशियाला अलग पाडण्याने जर्मनीची पूर्व आघाडी निर्वेध होणार होती आणि म्हणून हिटलरलाही स्टॅलिनच्या मैत्रीची गरज होती.

राष्ट्रीय स्वार्थाची भरभक्कम जाणीव असणाऱ्या राष्ट्रांचे आंतरराष्ट्रीय राजकारण कसे आकार घेत असते हे जाणून घेण्याच्या दृष्टीने या काळातील स्टॅलिन आणि हिटलर यांचे डाव आणि प्रतिडाव ध्यानात घेण्याजोगे आहेत.

स्टॅलिन आपल्याशी मैत्री करू इच्छितो आहे याचा अंदाज येताच हिटलरने 'केस व्हाईट'संबंधी आपल्या सेनानींशी चर्चा केली. आकस्मिक हल्ला करून पोलंड नष्ट करण्याच्या हिटलरच्या योजनेचे ते सांकेतिक नाव होते. 'केस व्हाईट'साठी हिटलरने तिथिनिश्चयही केला होता–१ सप्टेंबर १९३९.

रशिया आपल्या बाजूने उभा राहणार आहे अशी चिन्हे दिसू लागताच हिटलरला

ब्रिटन–फ्रान्सच्या मदतीची मातबरी वाटेनाशी झाली. ब्रिटनशी केलेला नाविक करार उधळून लावून हिटलरने आपल्या नव्या वाटचालीचे सूतोवाच केले. त्यानंतर त्याने पोलंडबरोबरचा अनाक्रमणाचा करारही आपल्याला मंजूर नसल्याने राईशस्टॅग-मध्ये सांगितले. या दोन तासांच्या भाषणात हिटलरने रशियाच्या निषेधाचा एकही शब्द उच्चारला नव्हता. हिटलर सत्तेवर आल्यापासून हे असे प्रथमच घडत होते. या घटनेचा नेमका अर्थ स्टॅलिनच्या ध्यानात आला.

ॲस्टाखोव्ह पुन्हा डॉ. श्नूर याच्या भेटीला गेला. प्रारंभी नेहमीप्रमाणे व्यापारी करारासंबंधी औपचारिक बोलणे झाले. त्यानंतर ॲस्टाखोव्ह म्हणाला, "जर्मनी आणि रशिया यांच्या परराष्ट्रीय धोरणात आता कोणताच संघर्ष उरलेला नाही. त्यामुळं या दोन राष्ट्रांनी आपलं जुनं वैर विसरून जायला हवं, होय ना?"

"तसं घडायला काहीच हरकत नाही," डॉ. श्नूरने सूचक उत्तर दिले.


त्यानंतर तीन दिवसांनी मॉस्कोतील जर्मन राजदूत काऊंट फ्रेडरिक वेर्नेर फॉन डेर शुलेनबर्ग याने नवा रशियन परराष्ट्रमंत्री मोलोटोव्ह याची भेट घेतली. त्यावेळी मोलोटोव्ह म्हणाला, "आमच्याशी व्यापारी संबध जोडायला तुम्ही तयार आहात हे आम्हाला माहीत आहे. परंतु शेवटी राजकीय संबंधावरच व्यापारी संबंध अवलंबून असतात म्हणून लवकरच आपल्याला त्या दृष्टीनं बोलणी करायला हवीत."

'मी बर्लीनला कळवितो.' शुलेनबर्गने सांगितले.

जर्मनी आणि रशिया यांच्या दरम्यान मैत्रीचे वारे वाहू लागले आहेत याचा कोलोन्द्र याला सुगावा लागताच त्याने बॉन्नेला तार केली–"पोलंडची फाळणी करण्याबाबत हिटलर आणि स्टॅलिन यांच्यात करार होण्याची दाट शक्यता आहे."

एवढी महत्त्वाची बातमी कळूनही बॉन्ने याच्याकडून कोणतीच हालचाल न झाल्यामुळे कोलोन्द्र अस्वस्थ झाला. म्हणून १ जून १९३९ रोजी त्याने बॉन्ने याला सविस्तर पत्र लिहिले. त्या पत्रात तो म्हणतो–"आपल्याला रशियाशी लढावे लागणार नाही अशी जर हिटलरची खात्री पटली तर पोलंडसाठी युरोपीय युद्धाचा धोका पत्करायला तो सहज तयार होईल. याउलट आपण कोठेही आक्रमण केले तर रशिया आपल्याविरुद्ध उभा राहील असे जर हिटलरला आढळून आले तर तो आपली महत्वाकांक्षा दाबून ठेवील, परंतु युद्धाला तयार होणार नाही. कारण रशियाशी युद्ध पत्करणे म्हणजे आपल्या देशाच्या, आपल्या पक्षाच्या आणि स्वतःच्याही विनाशाला निमंत्रण देण्यासारखे आहे, हे हिटलरला माहित आहे. म्हणून मला असे वाटते की यापुढे मुळीच वेळ न दवडता ब्रिटन आणि फ्रान्स यांनी रशियाशी लष्करी करार केला पाहिजे."

कोलोन्द्र याचे म्हणणे बरोबर होते. युरोपला युद्धापासून वाचविण्याचा ब्रिटन आणि फ्रान्स यांना तेवढा एकच मार्ग आता उरला होता. (क्रमशः)



थोर पुरुषांच्या सहधर्मचारिणींनी लिहिलेली आत्मचरित्रे ही अखेर पतिचरित्रेच असतात. हे जाणूनच, काही लेखिका, आत्मचरित्राची घडण न स्वीकारता स्मृतिकथनाचे स्वरूप स्वीकारतात. या स्मृती पतिपत्नीच्या सहजीवनातील असल्या तरी प्रायः त्यामधून, थोर पुरुषाच्या आयुष्याची दैनंदिन बाजू पाहण्याचे वाचकाचे कुतूहल गृहीत

# मीच हे सांगितलं पाहिजे

धरलेले असते. डॉ. केतकरांसारख्या दंतकथाविषय झालेल्या व्यक्तिमत्त्वाविषयी हे कुतूहल जरा वेगळे स्वरूप धारण करते. दंतकथा हा सत्याचाच आविष्कार मानून, अधिक रोमांचकारी कथा वाचण्याच्या हौसेमधून अशा चरित्रनायकांच्या कथांचे वाचन केले जाते. जरा अधिक सुबुद्ध वाचक असेल तर तो पत्नीने सांगितलेल्या चरित्रातून, अतिशयोक्तीच्या अंतरंगात जाऊन, खरे व्यक्तिमत्त्व शोधण्याचा प्रयत्न करतो. डॉ. केतकरांनी अन्यधर्मीय पाश्चिमात्य स्त्रीशी विवाह केलेला असल्याने, जनमानसात डॉ. केतकरांइतकेच त्यांच्या लोकविलक्षण वैवाहिक जीवनाविषयी कुतूहल आहे. त्यामुळे श्रीमती शीलवती केतकरांनी सांगितलेल्या आठवणींचा मराठी अनुवाद 'मीच हे सांगितलं पाहिजे' या वेधक नावाने प्रसिद्ध झाला त्यावेळी त्याचे औत्सुक्याने स्वागत झाले.

'मीच हे सांगितलं पाहिजे' या नावाचे भिन्नभिन्न अन्वयार्थ निघू शकतील. प्रारंभी – पुस्तक वाचण्यापूर्वी – या नावातून, श्रीमती शीलवती केतकरांनी पाहिलेले केतकर, त्यांना उमजलेले केतकर असा अर्थ सूचित असावा असे वाटत होते. परंतु पुस्तक प्रत्यक्ष वाचत असताना असे

सौ. पुष्पा भावे

लक्षात आले की जनमानसातील केतकरचित्राला ठाकठीक करावे, असाही प्रयत्न श्रीमती केतकरांनी केलेला आहे. एक तर मुद्दाम असा प्रयत्न करण्याची गरज नव्हती; कारण डॉ. केतकरांच्या विक्षिप्तपणाच्या कथा आज आदरमिश्रित कौतुकानेच सांगितल्या जातात, आणि दुसरे म्हणजे अशा प्रयत्नामुळे त्यांनी स्वतःच्या समृद्ध व्यक्तिगत अनुभवावर अन्याय केला आहे.

या पुस्तकाला श्रीमती केतकर यांनी त्रोटक आठवणींचा आकार दिलेला आहे. जर या आठवणींना विषयाचे सूत्र न देता त्यांनी या कथनात स्वतःच्या मनाच्या अंतःप्रवाहाचे सूत्र प्रमाण मानले असते तर आठवणींचा हा आकारही अर्थवाहक ठरला असता. परंतु प्रत्येक विषयाच्या संदर्भात डॉ. केतकरांचा दृष्टिकोन काय होता, त्यांच्या सवयी काय होत्या, हे वाचकांना सांगण्याचा प्रयत्न केल्यामुळे या पुस्तकाला माहितीपर स्फुटांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. (या माहितीत डॉ. केतकरांच्या कादंबरी लेखनाचा मात्र उल्लेखही नाही.)

शीलवतीबाई ज्यावेळी आपल्या वाचकांचा संदर्भ विसरतात त्यावेळी एखादा परिणामकारक प्रसंग वा प्रतिक्रिया त्या व्यक्त करून जातात. उदा. इंग्लंडमध्ये डॉ. केतकरांचा दाट परिचय असूनही हिंदुस्थानात त्यांना प्रथम पाहताना ओळख न पटणे, केतकरांच्या पागोटयाच्या रेशमी कापडाचा शीलवतीबाईंनी पोशाख शिवणे, या आठवणी पाहाव्या. त्यांनी सांगितलेल्या स्फुट माहितीतुन केतकरांच्या सर्वविषयी जागरूकतेचे आणि तरीही हिंदू धर्माकडे असलेल्या कलाचे अर्थपूर्ण दर्शन घडते.

मराठीत आठवणींच्या रूपाने आपल्या आयुष्याविषयी काहीही सांगू पाहणाऱ्या कोणाही लेखिकेला लक्ष्मीबाई टिळकांच्या ' स्मृतिचित्रां 'नी निर्माण केलेले मानदंड विसरून चालत नाही. कै. ना. वा. टिळकांच्या तुलनेने डॉ. केतकरांचे व्यक्तिमत्त्व अधिक संघर्षमय, गुंतागुंतीचे आणि भव्य होते. परंतु शीलवतीबाईंच्या या आठवणीतून निर्माण होणारे केतकरांचे चित्र लक्षणीय परिणाम करू शकत नाही. कारण एकीकडे शीलवतीबाईंजवळ या विलक्षण व्यक्तिमत्त्वातील असामान्यत्व ही विसंगती मानावी अशी विनोदबुद्धी नाही, आणि दुसरीकडे या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे प्रत्ययकारी दर्शन घडावे इतके आविष्कारमाध्यमावरील प्रभुत्व त्यांच्याजवळ नाही.

डॉ. केतकरांच्या अनेकविध कर्तृत्वाविषयी ज्याला आदर नाही, त्यांच्या कार्याचा आवाका पाहून जो चकित झालेला नाही असा मनुष्य महाराष्ट्रात असणे जरा कठीणच आहे. त्याचप्रमाणे त्यांना शीलवतीबाईंनी जी जीवनसाथ केली तिच्याविषयी जनमानसात कुतूहल आणि आदर आहे. परंतु विषय मोठा असणे, तपशील आकर्षक, मनोरंजक, अर्थपूर्ण असणे येथेच लेखनाचा हेतू पुरा होत नाही. वाचकाचे दुःख हे आहे की आठवणींच्या या अमोल रंगीत काचांची कॅलिडोस्कोपिक आकृती निर्माण होत नाही.

तरीही डॉ. केतकरांच्या लौकिक व्यक्तित्वाविषयीचे काळाच्या उदरात गडप होणारे अनेक तपशील श्रीमती शीलवती केतकरांनी ग्रंथबद्ध केले याबद्दल त्यांना आणि ह. वि. मोटे प्रकाशनाला धन्यवादच द्यावे लागतील.

---

## सार्थक

---

शारीर व्यंगातून निर्माण होणाऱ्या संघर्षावर कादंबरी लिहून ती भावविवशतेपासून दूर राखणे मोठे कठीण असते. सौ. शकुंतला गोगटे यांची ' सार्थक ' ही कादंबरी एका आंधळ्या माणसाच्या डोळस औदार्याविषयी लिहिलेली आहे. कथानायकाचा पिता आपल्या पुत्राला उद्देशून जणू दीर्घ निवेदन करत आहे, अशी या कादंबरीची काहीशी वेगळी रचना आहे. मातृविहीन पुत्राला ज्याने जीवापाड जपून वाढवले, आणि नंतर मित्रासारखे वागवले अशा सुसंस्कृत पित्याच्या तोंडून ही कथा आपण ऐकतो. त्यामुळे कथानायकाच्या कौतुकाबरोबर त्याच्या मित्रवर्तुळाचीही लक्षणीय माहिती आपल्याला मिळते.

कथानायक श्रीकांत आणि त्याचा गरीब व बुद्धिमान मित्र राजेश रानडे यांच्या बालमैत्रीतूनच, लेखिकेने श्रीकांतच्या मनाचा असूयेवर मात करण्याचा प्रयत्न करणारा, औदार्याकडे झुकणारा कल कौशल्याने व्यक्त केला आहे. बालमैत्रीतील हे औदार्य, या दोघांचेही प्रेम ज्यावेळी एकाच मुलीवर बसते त्या वेळी मात्र जागे होत नाही, आणि श्रीकांतच्या देखणेपणावर व ऐश्वर्यावर भाळून महाविद्यालयाची सौंदर्यराणी सुरेखा त्याच्याशी लग्न करते. सावळ्या विभावरी पंडितच्या भावना श्रीकांतच्या वडिलांखेरीज कोणाच्या लक्षात येत नाहीत. पुढे सुरेखाच्या आत्मकेंद्रित स्वभावामुळे तिचे आणि श्रीकांतचे पटेनासे होते. त्यात श्रीचे अपघातात डोळे जातात. सुरेखा त्याच्याशी घटस्फोट घेते. पुन्हा श्रीकांत आणि त्याचे वडील दोघेच राहतात. अचानक झालेल्या अपघाताच्या आणि पाठोपाठ आलेल्या सुरेखाच्या घटस्फोटाच्या धक्क्याने श्रीकांत बधीर होतो. राजेश आणि बाबा सोडून कोणालाही तो भेटत नाही. परंतु विभावरी पंडित पुन्हा त्याच्याकडे येते; स्त्रीविना पोरक्या झालेल्या त्या घराला माया देण्याचा यत्न करते. तिच्या प्रोत्साहनामुळे श्रीकांत ब्रेललिपी व संगीत शिकतो, पुन्हा मार्गाला लागतो. श्रीकांतचे वडील विभावरीचा आणि श्रीकांतचा विवाह घडवून आणू पाहतात, तर राजेश आणि विभावरीचे प्रेम ओळखून त्यांचा विवाह घडवून आणण्याची इच्छा श्रीकांत व्यक्त करतो. श्रीकांत येथे आपल्यापेक्षाही मोठा झाला हे वडिलांना पटते.

या कादंबरीत सुरेखाच्या पात्रावर लेखिकेने मोठा अन्याय केला आहे. सुंदर व


श्रीमंत मुलगी, मराठी कादंबऱ्यांमध्ये बहुवा असे चंचल, अहंकारी वर्तन घेऊन का येते न कळे. (हा वर्गविद्वेषाचा तर परिणाम नव्हे ना ?) खलत्व असले तरी व्यक्तिमत्त्व असायला हरकत नाही, हे लेखिकेला सुचले नसावे. शिवाय सुरेखा–श्रीकांतचा संघर्ष या कादंबरीत, श्रीकांतच्या आंधळेपणापेक्षा कमी महत्त्वाचा मानला गेला असल्याने त्याला रचनेत अस्थिर स्थान प्राप्त झाले आहे. अपंग माणसाच्या प्रतिक्रिया व्यक्त करणे हे या कादंबरीतील फार मोठे आव्हान लेखिका स्वीकारू शकली नाही.

परंतु ही कादंबरी वाचताना सौ. शकुंतला गोगटे यांच्या लेखनाविषयी अपेक्षा निर्माण होतात. या कादंबरीतील, मनुष्याच्या मनाच्या आदर्शांवर आधारलेल्या घटनांची रचना सर्वसाधारण कादंबरीत ठोकळेबाज वाटली असती; परंतु या लेखिकेच्या निवेदनाच्या घाटणीमुळे प्रस्तुत कादंबरीला व्यक्तिमत्त्व आणि वाचनीयत्व प्राप्त झाले आहे. मात्र काही वेळा लेखिका आपल्या लेखनगुणांच्या आकर्षणात गुंतून पडल्याचाही अनुभव येतो. उदा०–' तुझ्या चमकदार निळ्या निळ्या डोळ्यांचे ते सुंदर डोह कायमचे आटले होते रे–उरल्या होत्या त्या कुरूप खडबडीत खाचा ! नीलमण्यांची मौल्यवान रत्नं उखडून नेली गेली होती – उरली होती ती तुटकी, जळकी कोंदणं ! डोळ्यांची निळी पाखरं कुठंतरी उडून गेली होती–आणि उरला होता तो मोडका रिकामा पंजर !' एखाद्या शाळकरी पोराने निबंधात करावे तसे हे वर्णन प्रौढ कादंबरीत, विशेषतः एका रसिक प्राध्यापकाच्या तोंडी, अप्रयोजक वाटते.

तसे पाहिले तर ' सार्थक ' ही कादंबरी सांकेतिक कथानकावर आधारलेली आहे. परंतु लेखिकेच्या रचना–निवेदन कौशल्यामुळे तिच्यात वाचनीयत्व प्राप्त झाले आहे. मात्र या प्रकारचे वाचनीयत्व लाभलेले लेखन विकसित होईलच असे खात्रीने सांगता येणार नाही.

**मीच हे सांगितलं पाहिजे** : शीलवती केतकर : अनुवादक : रा. य. ओलतीकर : ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई १४ : मूल्य पंधरा रुपये.

**सार्थक** : सौ. शकुंतला गोगटे : कुळकर्णी ग्रंथागार प्रकाशन, पुणे : मूल्य पाच रुपये.






अॅडव्होकेट
माधव
कानिटकर

लेखांक
एक

रात्रीचे १२ वाजले होते. १ एप्रिल १९५७ हा दिवस संपला ! मुकेरिअन पोलीस स्टेशनवर नाईट ड्यूटी-वर असलेले सब-इन्सपेक्टर शिवप्रसाद आज खुषीत होते. रात्री ८ ला ते ड्यूटीवर आल्यापासून शिवीगाळ आणि किरकोळ मारामाऱ्या असल्या फालतू तक्रारीच फक्त आल्या होत्या. ९।-९॥ ला एक बाई येऊन मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार देऊन गेली होती. तिला त्यांनी सांगून टाकले होते की, ' अजून १–२ तास वाट बघ त्याची. नाहीच आला १२ वाजेपर्यंत तर निघतोच मी त्याला शोधायला. ' आज कुठे काही मोठी भानगड झाली नव्हती. पोलीस अधिकाऱ्याला तरी निदान दैवात काय लिहिलंय ते अगोदर कळत असतं तर ? कारण आता पुढच्या १५–२० मिनिटात मोठी घडामोड घडवणार होतो आणि ती देखील पोलिस स्टेशनवरच.

मुकेरिअन हे उपनगर पंजाबमध्येच काश्मिरच्या

दिशेने आहे. या उपनगराची एकंदर परिस्थिती पुण्या-मुंबईच्या अगदी अलीकडे असलेल्या उपनगरांसारखी आहे. म्हटला तर गाव म्हटलं तर शहर एका पोलीस स्टेशनपुरतं.

सब-इन्सपेक्टर शिवप्रसादनी घड्याळ पाहिले. १२ वाजून २० मिनिटं झाली होती. त्यांनी त्यांची कॅप डोक्यावर ठेवली आणि ते ओरडले, 'हवालदार! जीप काढा. दोघा-तिघांनी माझ्याबरोबर चला, बाकीच्यांनी इथेच थांबा. मी त्या बाईच्या पोराची काही खबर मिळते का त्याचा तपास करून येतो. अर्ध्या-पाऊण तासात आलोच मी.'

सब-इन्सपेक्टर शिवप्रसाद आणि तीन हवालदार यांची जीप पोलीस स्टेशनच्या आवारातून बाहेर पडली. मुख्य दरवाजाजवळच्या पहारेकऱ्याने लोखंडी जाळीचा दरवाजा लावून घेतला आणि तो आतल्या बाजूलाच स्टुलावर बसून राहिला, साहेबांच्या जीपचे दिवे दिसले की दरवाजा उघडायला.

मुकेरिअन पोलीस स्टेशनच्या मागच्या बाजूला तुरुंग होता. कोर्टाच्या परवानगीने 'अधिक चौकशीसाठी' पोलिसांच्या ताब्यात दिलेले आरोपी तिथे ठेवलेले असायचे. आज त्या तुरुंगात फक्त एकच आरोपी होता. त्याच नाव होतं लाल मशी. एका लहानशा वस्तूच्या चोरीबाबत त्याला आणला होता. इन्सपेक्टर शिवप्रसाद जीप-मधून बाहेर पडता पडताच मनात म्हणाले होते, 'काही नाही साऽऽधी चोरीची-तर केस आहे. चार पाच, कानफटात मारल्या की बोलायला लागेल!' सब–इन्सपेक्टर शिवप्रसादना काय कल्पना की ज्याला थोबडवायचा आपण विचार करतो आहोत त्याच लाल मशीची पुढे आपल्याला जरूर लागणार आहे म्हणून? तुरुंगाच्या मागच्या बाजूला पटांगण होतं आणि पटांगणाच्या टोकाला होत्या पोलिसांच्या बॅरेकस्. बॅरेकस्, तुरुंग आणि पोलीस स्टेशन या तिघांच्या भोवती उंच दगडी भिंतीचं कुंपण होतं. आता पोलीस स्टेशनवर एक हेड कॉन्स्टेबल आणि १५ कॉन्स्टेबल्स होते. त्या दिवशी उकाडा होत होता. हेड कॉन्स्टेबलने त्याच्या बॅरेकमध्ये जाऊन एक खाट बाहेर काढली. तुरुंग आणि बॅरेकस् यांच्यामधल्या मोकळ्या मैदानात ती आडवी टाकली आणि आडवे होता होता त्याने तिथून ओरडून सांगितले,

'४४१३! जरा लक्ष ठेवा. साहेब बाहेर गेल्येत. त्यांना यायला तासभर तरी लागेल, मी आराम करतो.'

.. आणि त्याच क्षणी पोलीस स्टेशनच्या भिंतीला बाहेरच्या बाजूने तिरकस टेकवलेल्या एका फळीवरून सात बंदुकधारी माणसं भिंतीवर चढून आली होती. ही भिंत पोलीस स्टेशनच्या मागच्या बाजूला होती. त्यातल्या मुख्य व्यक्तीने हुकूम दिला, 'हळूहळू या. आवाज करू नका. एकेकाने जाऊन पोलीस स्टेशनच्या छपरावर चढा. 'तो' समोरून येईलच आता एक दोन मिनिटात.'



... आता साडेबारा वाजले होते. अचानक आणखी एका बंदुकधारी व्यक्तीने पोलीस स्टेशनच्या समोर असलेला लोखंडी दरवाजा जोरात खडखडावला. आतल्या बाजूला स्टुलावर बसलेल्या पहारेकऱ्याला ही दादागिरी आवडली नाही. रागाने त्याने बंदूक उचलली आणि तो उभा राहला. पहारेकरी काही बोलण्यापूर्वी त्या बाहेरच्या व्यक्तीने लोखंडी दरवाजावर लाथ मारली आणि करड्या आवाजात त्याने हुकूम केला.

'दरवाजा खोलो ऽ ऽ !'

'क्या काम है ?'

'साहेबाना भेटायचंय '

'साहेब बाहेर गेल्येत'

'दुसरा कोण साहेब आहे ड्युटीवर त्याला भेटतो. चल दरवाजा खोल!'

'दुसरा कोणी साहेब नाही आहे. दादागिरी काय चालवल्येस इतक्या रात्री. नही खोलेगा, जा ऽ व!'

... त्याचं हे संभाषण पोलीस स्टेशनच्या छपरावरून सात व्यक्ती ऐकत होत्या. त्यातल्या तिघांनी वरून खाली उड्या मारल्या. धावत येऊन मागून दोघांनी पहारेकऱ्याला धरला आणि त्याची बंदूक काढून घेतली. तिसऱ्याने आतून कडी काढली. आणि बाहेरच्या व्यक्तीने आत येऊन रागारागाने पहारेकऱ्याकडे पहात हवेत बंदूक झाडली. न बोलता त्याला विचारलं, 'समजली माझी ताकद?' बंदुकीच्या गोळीचा आवाज झाल्याबरोबर पोलीस स्टेशनवर गडबड उडाली. खाटेवर मोकळ्या हवेत आराम करणारा हेड कॉन्स्टेबल निर्भयसिंग ताडकन उठला आणि त्या चौघांच्या दिशेनें धावत आला. निर्भयसिंग तो! पण त्याचा अंदाज चुकला! त्याला वाटलं बाकीचे हवालदार येईपर्यंत मी एकटा चौघांना भारी पडेन. पण झालं भलतंच. त्या चौघांपैकी तिघांनी गोळीबार सुरू केला. एकाने क्रूरपणे निर्भयसिंगला तीन गोळ्या घातल्या. हेड कॉन्स्टेबल निर्भयसिंग रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला कायमचा आराम करण्यासाठी. आता पोलीस स्टेशनच्या छपरावरून सुद्धा गोळीबार चालू झाला. त्यातली एक गोळी पहारेकऱ्याच्या दंडात घुसली, आणि केविलवाणा ओरडून तो विव्हळत पडला. बाकीचे हवालदार बाहेर येऊ शकले नाहीत; कारण पोलीस स्टेशनच्या सर्व बंदुका आतमध्ये एका लाकडी पेटीत होत्या, आणि त्या पेटीची चावी हेड कॉन्स्टेबल निर्भयसिंग त्याच्याकडे ठेवत असे. पोलीस स्टेशनच्या खिडकीतून निर्भयसिंग कसा मारला गेला ते त्यांनी पाह्यलं होतं. कुणाची बाहेर येण्याची हिंमत नव्हती. तुरुंगात असलेला लाल मशी बिचारा थरथर कापत हा सर्व प्रकार पहात होता. त्याने गयावया करीत त्या चौघांना ओरडून सांगितलं, 'मला मारू नका हो ऽऽ! घरी बायकामुलं आहेत. गरीब आहे फार मी.' ते चौघे खदखदा हसले आणि त्याला म्हणाले, 'घाबरू नकोस, आम्ही तुला नाही मारणार. तू तुरुंगात आहेस म्हणजे आमचा दोस्त आहेस!'

त्या चौघांनी पोलीस स्टेशनच्या छपरावर उभे असलेल्या आणखी चौघांना इशारा दिला आणि ते चौघेही धपाधप उड्या मारून खाली आले. आता त्या आठ जणांपैकी एकाने आवाज दिला, 'चलो ऽऽ हवालदारकंपनी, बाहर आव. येताना बंदुका आणू नका नाहीतर बघा भारी पडेल. आणखी हवालदार मरतील.'

सर्व हवालदार चोरासारखे बाहेर आले! त्यांना हुकूम झाला;

'एका लायनीत उभे रहा.'

हवालदार गुपचूप लायनीत उभे राह्यले.

दुसरे दोघं तिघं आत जाऊन आत एखादा हवालदार लपून बसलेला नाही ना,

याची खात्री करून आले, आणि त्यातल्या मुख्य इसमाने हवालदारांच्या पुढे उभं राहून उजव्या हाताचा पंजा पुढे करून दरडावले, 'चावी लाव'

एका हवालदाराने हेड कॉन्स्टेबल निर्भयसिंगाच्या प्रेताकडे बोट दाखवीत भीत भीत सांगितले, 'चाव्या त्यांच्याकडे असतात.'

ताबडतोब निर्भयसिंगाच्या प्रेताची झडती घेण्यात आली. चाव्या मिळाल्या नाहीत. त्यातल्या प्रमुख व्यक्तीने रागारागाने हवेत गोळ्या झाडल्या आणि तो ओरडला, 'खोटं बोलता काय? आमच्याशी धोकेबाजी कराल तर तुमच्यापैकी आणखी एकाला मारीन. बोला, चावी कुठाय?'

सगळे हवालदार थरथर कापू लागले. अचानक त्यातल्या एकाला आठवण झाली की हेड कॉन्स्टेबल खाटेवर झोपला होता तिथे चाव्या कदाचित पडल्या असतील. त्याने चाचरत सांगितले की, 'ती खाट दिसत्ये ना? तिथे मघाशी हेड कॉन्स्टेबल झोपले होते, तिथे आहे का बघतो?'

लगेच मुख्य इसमाने इतर सातांपैकी एकाला हुकूम दिला, 'जा रे, या हवालदाराला घेऊन जा, आणि त्याला चाव्या नाही मिळाल्या तर त्या खाटेवर आडवा पाडूनच त्याला गोळ्या घाल! म्हणजे या इतर हवालदारांना जरा अक्कल येईल.'

तो बिचारा हवालदार अक्षरशः जीव मुठीत धरून खाटेपर्यंत चालत गेला. त्याच्या बायकोचं कुंकू बळकट! खाटेवरतीच उशीखाली चाव्यांचा जुडगा मिळाला. इतर हवालदारांचा जीव भांड्यात पडला. त्यानंतर तुरुंग उघडण्यात आला आणि सगळ्या हवालदारांना हुकूम झाला, 'चलो अंदर!' लाल मशीला बाहेर काढून त्याच्या पाठीत प्रेमळपणे (!) एक बुक्का मारून त्याला सांगण्यात आलं, 'चल दोस्त भाग!' पण तो पळून जायला तयार होईना. त्याने गयावया करीत सांगितले, 'पळून जाऊन काय फायदा? हम बालबच्चेवाला आदमी है. पोलीस पुन्हा पकडून आणतील, आणखी मारतील.' सगळेजण हसले. आपसात म्हणाले, 'प्रथमच तुरुंगात आलेला दिसतोय.'

'इस धंदेमे नया दिखता है.'

'बच्चा है अभितक. चलो जाने दो.'

शेवटी लाल मशीसकट सगळे हवालदार लॉकअप्मध्ये बंद झाले. बाहेरून कुलूप ठोकलं गेलं आणि ते आठही जण पुढच्या कामाला लागले. प्रथम त्यांनी कॅश बॉक्स उघडली. त्यातले हजार रुपये रोकड खिशात टाकले. पोलीस स्टेशनमधून बाहेर येताना अच्चरसिंग नावाच्या एका हवालदाराने त्याचं घड्याळ टेबलाच्या खणात ठेवलं होतं ते एकाने आपल्या हातावर बांधलं. दोघातिघांनी लाकडी पेटी उघडली, आतमध्ये बंदुका होत्या. त्यातली एक झकास ·३०३ रायफल एकाने खाकोटीला मारली. स्टीलच्या कपाटात तीन पिस्तुलं मिळाली ती काढून घेतली. एका सुटकेसमध्ये काडतूसं, गोळ्या, आणि एक लाइट रायफल मिळाली. तर इन्स्पेक्टर शिव-

प्रसादच्या बॅगमध्ये त्यांचं स्वतःचं पिस्तुल आणि त्यांची स्वतःची लाइट रायफल मिळाली. या रायफलवर अक्षरं कोरलेली होती 'S. P.' पैसे आणि शस्त्रास्त्रं यांची ही लूट म्हणजे त्या आठ लोकांची लयलूट होती. मोठ्या आनंदात त्यांनी हवेत गोळीबार केला आणि त्यांच्या प्रमुखाने त्यांना हुकूम दिला,

'आता वेळ फार कमी आहे. लवकर चला.'

'आता कुठे जायचं ?'

'पंजाब नॅशनल बँक !'

आठ लोकांची ही गँग पंजाब नॅशनल बँकेच्या शाखेजवळ आली तेव्हा बाजूच्याच टॉवरच्या घड्याळात रात्रीचे २ वाजले होते. बँकेचा वॉचमन रात्री दिवे ठेवून पहारा देत असे. गँगच्या प्रमुखाने हुकूम दिला, 'आता २ वाजलेत. पोलीस स्टेशन-वर साहेब कदाचित परत आले असतील. आता वॉचमनबरोबर बाचाबाची करू नका. एकदम मारून टाका ! वेळ कमी आहे.'

ठरल्याप्रमाणे आठही जण बँकेजवळ आले. वॉचमन जागा होता. एकाने नेम धरला आणि खलास ! वॉचमन रक्ताच्या थारोळ्यात तडफडू लागला. आठहीजण एकदम आत घुसले आणि दरवाजे–खिडक्या फोडून त्यांनी आत उड्या मारल्या. त्यांनी प्रथम स्टीलचं कपाट फोडलं. आत फक्त बँकेच्या फायली आणि कागदपत्रं. त्यांनी ड्रावर्स उघडून पाहिले, कुछ नही ! शेवटी ते तिजोरीपर्यंत पोचले, पण तिजोरी फुटेना. त्या सर्वांनी तिजोरीवर हातोड्याचे खूप घाव घालून पाहिले. पण रामा, शिवा, गोविंदा ! जखमी वॉचमन सरविंदरसिंग त्याही स्थितीत हे पहात होता.

...इतक्यात बंदुकीचे दोन बार झाले ! दरोडेखोर घाबरले ! त्याचं असं झालं की दीड वाजताच सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद त्या हरवलेल्या मुलाची चौकशी करून परत आले. त्यांनी जीप पोलीस स्टेशनच्या दरवाजापर्यंत आणली. दरवाजा उघडा आणि पहारेकरी विव्हळतोय ! त्यांनी हवालदारांना हाका मारल्या. पण कोणी बाहेर येईना ! सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद सावध झाले. सावधगिरीने त्यांनी झपाट्याने जीप मागे घेतली. त्यांना वाटलं पोलीस स्टेशनमध्ये कोणी तरी असणार, तो कदाचित गोळी मारील ! त्यांनी कमरेला हात घातला. जाताना त्यांनी पिस्तुल नेलं नव्हतं. पोलीस स्टेशनच्या समोरच रहाणाऱ्या एका व्यापाऱ्याकडे बंदुकीचं लायसन्स आहे हे त्यांना ठाऊक होतं. ते सरळ वर गेले, त्याला उठवला आणि घाईघाईत त्याला म्हणाले,

'पटकन तुझी रायफल आण ! भरलेली आहे ना ?'

'रात्री नेहमीच भरलेली असते साहेब ! हा काय प्रकार आहे ? मी गेला पाऊण



तास बंदुकीचे आवाज ऐकतोय ! मी उठलोच नाही. मला वाटलं रात्रीच्या वेळी हवालदारांसाठी ट्रेनिंग चालू आहे !'

'बडबड करत बसू नको ! आधी बंदूक आण.' सबइन्स्पेक्टर शिवप्रसाद बाल्कनीत आले आणि पोलीस स्टेशनच्या आत (!) असलेल्या माणसाला हूल देण्यासाठी पोलीस स्टेशनवर त्यांनी दोन गोळ्या झाडल्या !

...हाच आवाज दरोडेखोरांनी ऐकला. कारण पंजाब नॅशनल बॅंकेची शाखा पोलीस स्टेशनपासून फक्त १ फर्लांग होती. पंजाब नॅशनल बॅंकेसमोरच डॉक्टर बालकृष्ण यांचा बंगला होता. पण ते गेला पाऊण तास गोळीबार ऐकत होते. आता आणखी दोन आवाज त्यांनी ऐकले. त्यांनी बाल्कनीतला दिवा लावला आणि ते बाहेर येऊन उभे राह्यले. समोरच आठ दरोडेखोर हातात बंदुका आणि लूट घेऊन

उभे होते. त्यांची आपसात चर्चा चालू होती,

'आणखी १५ – २० मिनिटं मिळायला हवी होती. कदाचित तिजोरी फुटली असती !'

'एखादा प्रायव्हेट कारवाला आता येऊ दे. सरळ त्याला गोळी घालतो. आपण त्याची कार घेऊन जाऊ. पैसा मोठा का जीव मोठा ! मिळालंय ते पण काही कमी नाही आहे !'

डॉ. बालकृष्ण सगळं ऐकत होते आणि दरोडेखोरांकडे पहात होते !...अचानक दरोडेखोरांच्या प्रमुखाने हलक्या आवाजात त्यांना दम दिला, 'नालायक ! कशाला बडबडता उगाच ! प्रायव्हेट कारची वाट बघणं आणि इथे थांबणं धोक्याचं आहे. वर बघा. एक माणूस आपल्याला पहातोय आणि तुमचं बोलणं एकतोय. उसको उडाव !'

क्षणार्धात एक गोळी सणसणत डॉ. बालकृष्णांच्या दिशेने गेली. पण डॉ. बालकृष्ण लकी ! त्यांच्या बायकोने वैतागून आतलं बटन दाबून बाल्कनीतला दिवा मालवला आणि वैतागून ती म्हणाली, 'कशाला उगाच अपरात्री बाहेर गेलात ? होऊ देत ना गोळीबार. तुम्हाला तर नाही ना मारली कुणी ? आपल्याला करायचंय काय ?'

दरोडेखोरांची गोळी चुकली ! डॉ. बालकृष्ण झटकन् खाली बसले आणि बाल्कनीच्या जाळीतून त्यांनी पाह्यलं दरोडेखोर बस डेपोवर जाऊन पोचलेत. त्यांनी पोलीस स्टेशनला फोन केला, पण रिसिव्हर कुणी उचलायला तयार नाही !

दरोडेखोरांचं नशीब बलवत्तर म्हणू का त्यांना कमनशिबी म्हणू ? बस डेपोकडे जाताना त्यांना आणखी एका इसमाने पाह्यले होते. हा होता मोतासिंग ! दूधवाला ! तो २॥–३ ला बस–डेपोच्या बाजूने दररोज जात असे आणि दररोज कधी न दिसणारी मंडळी बंदुका घेऊन लगबगीने इकडे कुठे ? या विचाराने त्याने त्यांना नीऽऽट पाहिले !

आठ लोकांपैकी एकाने डेपो मॅनेजरकडे जाऊन चौकशी केली, 'आता कुठली बस सुटणार ?'

'कुठलीच नाही. आता बस चालू होणार उद्या पहाटे !'

दरोडेखोरांचं नशीब बलवत्तर असंच म्हटलं पाहिजे. एक रिकामी बस डेपोजवळ उभी होती. कुणीतरी बस ड्रायव्हर युनिफॉर्ममध्ये बाजूलाच सिगरेट पीत उभा होता. डेपो मॅनेजरचं ऑफीस आणि बस यांच्यात बरंच अंतर होतं. एका दरोडेखोराने पिस्तूल काढलं आणि सरळ त्या बस ड्रायव्हरच्या छातीवर रोखून त्याने त्याला दम भरला,

'मी सांगेन त्याप्रमाणे सीधा चल ! नाही तर गोळी मारीन. बायका–पोरं आहेत ना ? का मरायचंय !'

बस ड्रायव्हर घाबरला. सांगितल्याप्रमाणे सरळ बसमध्ये ड्रायव्हरच्या जागेवर

बसला. पिस्तुलधारी दरोडेखोर त्याच्या बाजूला बसला. बाकीचे दरोडेखोर मागे बसले आणि बस चालू झाली! जाताना इतरांना दहशत बसावी म्हणून दरोडेखोरांनी बस डेपोवर गोळीबार केला! हे आवाज सब-इन्सपेक्टर शिवप्रसादांनी ऐकले. ते समजले की पोलीस-स्टेशनमध्ये कुणी नाही. आपणच फसलो.

...बस जवळ जवळ चार मैल भरधाव गेली. आणि ड्रायव्हरला हुकूम सुटला, 'खडी करो!' बस थांबली आणि ड्रायव्हरला दुसरा हुकूम सुटला, 'अब उतरो नीचे और भागो!' ड्रायव्हरला तेच हवं होतं. पहाटेची वेळ. रस्त्यात पुढे मागे कोणी नाही. तो जीव घेऊन मागे पळत सुटला. पिस्तुलधारी दरोडेखोराने आता पिस्तुल खिशात टाकले आणि त्याने स्वतःच बस चालू केली. बस आणखी ५–६ मैल पुढे गेली आणि त्यानंतर त्या आठही लोकांनी ती बस सोडून दिली. आणि ते आपापल्या ठरलेल्या मार्गाने निघून गेले. उतरताना दरोडेखोर ड्रायव्हर बसच्या मडगार्डवर हात टेकून उतरला! तर मागच्या काही लोकांनी चाळा म्हणून खिडक्यांच्या काचांवर हात मारले!

इकडे सब-इन्सपेक्टर शिवप्रसाद तीच रायफल घेऊन पोलीस स्टेशनमध्ये शिरले. आतमध्ये कुणी नव्हतं. सगळे हवालदार लॉकअप्मध्ये बंद! त्यांनी विचार केला दरोडेखोरांचा पाठलाग करू. त्यांनी जीप काढली. तेवढ्यात डेपो मॅनेजर पोलीस-स्टेशनवर धापा टाकीत आला. म्हणाला, 'काय साहेब! फोन करून करून थकलो. आठ माणसं! त्यांच्याजवळ बंदुका होत्या. आमची बस घेऊन पळाले!'

सब-इन्सपेक्टर शिवप्रसादच्या लक्षात आलं की आता त्यांचा पाठलाग करण्यात अर्थ नव्हता. आता पहाट झाली होती. त्यांना ओव्हरटेक करणं कठीण होतं. त्यांनी डेपो मॅनेजरला शांत केलं आणि ताबडतोब फिंगर प्रिंट ब्यूरोला फोन केला,

'हॅलो! S. I. शिवप्रसाद हियर. कुणी फिंगर प्रिंट एक्सपर्ट आता आहे?'

'आहे साहेब! एका मर्डर केसचे हॅंडप्रिंटस् डेव्हलप् करतोय.'

'त्याला ताबडतोब इकडे पाठवा. इकडे पोलीस कॉन्स्टेबलचाच मर्डर झालाय!'

फिंगर प्रिंट एक्सपर्ट आला. त्याने लॉकअप्च्या कुलुपावरचे, पोलीस स्टेशनमधल्या स्टील कॅबिनेटवरचे, टेबलावरचे, ड्रॉवरवरचे ठसे घेतले. त्यानंतर सब-इन्सपेक्टर शिवप्रसादनी एक कागद काढला आणि पहारेकरी संतरामचे स्टेटमेंट घेतले. त्याच कागदावर खाली त्याची सही घेऊन त्याच कागदावर त्याच्या खाली पोलीस स्टेशनवरून चोरीला गेलेल्या वस्तूंची नोंद केली. रिव्हॉल्व्हर्स, रायफल्स, लायसन्स, घड्याळ, काडतूस आणि गोळ्या यांची अचूक यादी दिली.

तेवढ्यात सकाळचा ड्यूटी ऑफीसर ड्यूटीवर आला. त्याला त्यांनी तातडीने फिंगर प्रिंट एक्सपर्टबरोबर पंजाब नॅशनल बॅंकेत पाठवला, कारण तिथून फोन आला होता की, 'आमच्या बॅंकेच्या वॉचमनला कुणीतरी गोळी मारली. तो जिवंत आहे! पण तडफडतोय.' फिंगर प्रिंट एक्सपर्टने बॅंकेच्या तिजोरीवरचे, टेबलावरचे,

स्टील कॅबिनेटवरचे ठसे घेतले. दुसऱ्या साहेबानी बँकेच्या वॉचमनला हॉस्पिटल-मध्ये अॅडमिट केला. तर इकडे सब-इन्सपेक्टर शिवप्रसादनी पहारेकरी संतरामला हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केला, आणि त्यांनी जीप बाहेर काढून दरोडेखोरांचा पाठलाग (!) सुरू केला. मुकेरिअन पोलीस-स्टेशनपासून सुमारे १०–११ मैलांवर 'ती' रिकामी बस उभी होती. फिंगर प्रिंट एक्सपर्टने बसच्या मडगार्डवरच्या एका हाताच्या पंजाचे आणि खिडक्यांच्या काचांवर उठलेल्या बोटांचे स्पष्ट ठसे घेतले. सब-इन्सपेक्टर शिवप्रसादांच्या लक्षात आलं की दरोडेखोर इथूनच पुढे कुठेतरी पायी चालत गेले. बसच्या पुढच्या रस्त्यावर पायाचे ठसे नव्हतेच. दोन्ही बाजूच्या रस्त्याच्या कडेला चिखलात आणि मातीत आठ लोकांचे वेगवेगळे ठसे उमटले होते. ताबडतोब प्लॅस्टर ऑफ पॅरीस टाकून त्यांचे आकार पोलिसांनी ताब्यात घेतले. आणि सब-इन्सपेक्टर शिवप्रसादनी घाम पुसला! काय होणार आहे या केसचं? प्रत्यक्ष पोलीस स्टेशनवर हल्ला?

२ एप्रिल १९५७ चे संध्याकाळचे पेपर्स तडाखेबंद संपले. पहिल्याच पानावर हेड लाइन्स होत्या–

'पंजाब नॅशनल बँकेवर नाट्यपूर्ण हल्ला!'

'पोलीस स्टेशनवरच दरोडा! १ खून, १ जखमी.'

'पोलिसानांच पोलीस कस्टडी!'

...सबंध पंजाबमध्ये खळबळ माजली. पोलीस खाते हादरून गेले. लोक टवाळी करू लागले, 'पोलिसांची ही अवस्था. तिथे ते आमचं रक्षण काय करणार! हे काय राज्य आहे? वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्यात खळबळ माजली. या दरोड्याच्या तपासाची सूत्रे डेप्युटी इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस, स्टेट ऑफ पंजाब, श्री. आश्विनकुमार यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी जातीने लक्ष घालून खालच्या पोलीस अधिकाऱ्यांना कडक सूचना दिल्या, 'लोकांचा विश्वास संपादन करायचा असेल तर शक्य तितक्या लवकर आरोपींना अटक करा. आपल्या अब्रूचा प्रश्न आहे.'

सब-इन्सपेक्टर शिवप्रसादांची जबाबदारी वाढली. त्यांनी तपास चालूच ठेवला...

(क्रमशः)

# एक राष्ट्रीय समस्या

संततिनियमन हा आजच्या काळाचा युगधर्म आहे. काहींना हे विधान रुचेल. काहींना रुचणार नाही. बहुतेकांना यात सरकारी प्रचाराचा वास असल्याचा संशय येईल.

'धारयति इति धर्मः' समाजाची धारणा करतो तो धर्म. ही अशी धर्माची सोपी पण नेमकी व्याख्या करण्यात येते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपेक्षा आता या देशाची लोकसंख्या दुपटीने वाढली आहे आणि एकविसाव्या शतकात पदार्पण करताना ती पुन्हा एकदा दुप्पट झालेली असेल. (अंदाजे अब्जाहून अधिक.)

या वाढत्या समाजाची धारणा करणारा धर्म कोणता असू शकेल ?

लहानपणीचे संस्कार, यौवनामधले विचार आणि प्रौढपणीचे आचार या सर्वांमधून धर्म साकार होत असतो. त्या काळाला अनुसरून आणि व्यक्ती व राष्ट्र-विकासाला आवश्यक त्या सर्व गोष्टी हा धर्म माणसाला पुरवतो. जर त्यासाठी तो अपुरा ठरेल तर तो बदलावा लागेल.

आधुनिक संस्कार मिळवलेला तुमचा मुलगा ज्यावेळी तुम्हाला येथल्या दारिद्र्याची, टंचाईची, वाढत्या महागाईची कारणे विचारील आणि उत्तरे मागील त्यावेळी तुम्हाला जुना धर्म बासनात गुंडाळून समृद्धीच्या साधनेसाठी त्याला नवीन वैज्ञानिक धर्म सांगावा लागेल. आणि त्या ग्रंथाचे एक प्रकरण असेल संततिनियमन.

ही धार्मिक दृष्टी स्वीकाराल तर काम सोपे आहे.

परिस्थितीच्या भयानकतेचा विचार केला तर लहानपणापासून योग्य त्या प्रकारे या संबंधीचा निकोप दृष्टिकोन तयार करणारे शिक्षण देणे जरुरीचे आहे. शक्य आहे. गेल्या वीस वर्षात देशाची लोकसंख्या अठरा कोटीने वाढली तर महाराष्ट्राची ३ कोटीवरून ५ कोटीवर गेली. वाढत्या वैद्यकीय सुखसोयींमुळे सरासरी आयुर्मर्यादा बत्तीसवरून त्रेपन्नवर गेली. तर जननप्रमाण हजारी बेचाळीसवरून हजारी एकूणचाळीस एवढेच फक्त कमी आले. वाढत्या लोकसंख्येच्या या अतिवृष्टित समृद्धीची पिके तरारून उभी राहू शकत नाहीत. हरितक्रांतीचे फलित दूर पळते आहे.

– त्यासाठी १९८० पर्यंत हे प्रमाण हजारी पंचवीस एवढे कमी असावयास हवे.

मुलांना जबाबदार बनवावयाचे असेल तर त्यांना कुटुंबाच्या व राष्ट्राच्या समस्या समजावून सांगाव्या लागतात. अर्थात त्याचे विचार, वयोमान, अभिरुची लक्षात घेऊनच. पण त्या टाळन कधीच चालत नाही. राष्ट्राची आव्हाने शिक्षणातूनच स्वीकारली जातात.

तेव्हा शिक्षणक्रमात वाढती लोकसंख्या, उत्पन्नाची मर्यादित साधने व साठे आणि याचा मेळ घालून विकास साधण्यासाठी करावयाच्या अनेक उपायांपैकी एक म्हणून लोकसंख्या काबूत राखण्याची आवश्यकता व त्यासाठी प्रभावी उपाय योजण्याची गरज या गोष्टी जरूर सांगितल्या जाव्यात. प्रत्यक्ष माहितीच दिली पाहिजे असा वेडा आग्रह कोणीच धरत नाही.

आपल्याकडे मुलांसमोर या विषयावर बोलणे मोठे पाप समजले जाते. मुलांना माहिती होतेच, पण ती विकृत प्रकारे. त्यापेक्षा नेमकी शास्त्रीय माहिती झाली तर काय हरकत आहे ?

दिल्ली शहरातील व आजूबाजूच्या खेड्यातील वेगवेगळ्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत शाळांतून अनेक बाबतीत भिन्नता असलेल्या सुमारे दोन हजार मुला-मुलींना व चारशे शिक्षकांना काही प्रश्न विचारले गेले. डॉ. एडवर्ड पोलमन श्री. राव व श्री. यादव यांनी हा अभ्यास केला. पुढे ते निष्कर्ष दिले आहेत. (टक्केवारी ही प्रत्येक वर्गातील मुलांच्या प्रमाणात काढून नंतर त्याची सरासरी काढण्यात आली.)

| | | ग्रामीण | | शहरी | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली |
| | इयत्ता | टक्के | टक्के | टक्के | टक्के |
| तांबडा त्रिकोण दाखवून-हे कशाचे चिन्ह आहे ते सांगू शकता ? (पहिल्याच खेपेस होय उत्तर देणाऱ्याचे प्रमाण दिले आहे) | पहिली ते तिसरी | १ | ० | १० | ० |
| | चौथी ते सातवी | १६ | ६ | ४८ | २० |
| | आठवी ते अकरावी | ५५ | २४ | ७९ | ५८ |
| | पालक | ३० | ९ | ८३ | ४६ |

आठवी ते अकरावीमधील मुलांना विचारण्यात आलें, समजा आईवडिलांना त्यांना पाहिजे तेवढी मुले आहेत. आणि त्यांना अधिक नको आहेत. ती न होण्याची सर्वोत्तम पद्धती कोणती ? (तक्ता पृ. ४७ वर पहा)

ज्या मुलांनी जी पद्धती सांगितली त्यापैकी बऱ्याच जणांना तेवढीच पद्धत माहीत होती. कारण पद्धतीचे फायदे तोटे विचारल्यावर येणारी उत्तरे अतिशय अस्पष्ट होती. कदाचित संकोचाचाही हा परिणाम असू शकेल. ( अर्थात मुलींची मुलाखत स्त्रियांनी घेतली होती.)

वाढत्या लोकसंख्येमुळे आणि इतर देशांच्या तुलनेने आयुर्मर्यादा कमी असल्याने आपल्या देशातील सुमारे ४२% लोकसंख्या ही पंधरा वर्षे वयाच्या आतील मुला-मुलींची बनलेली आहे. इतर देशात हे प्रमाण २५% ते ३०% टक्के असते. दरवर्षी सुमारे नऊ लाख मुली वयात येतात आणि विवाहाच्या किमान वयाचा कायदा पुस्तकात ठेवून यापैकी बहुतेकांची लवकरच लग्ने होतात. या पार्श्वभूमीवर आपण विचार केल्यास आपण जर ही राष्ट्रीय व शासकीय समस्या समजत असू तर या

| | ग्रामीण | | शहरी | |
|---|---|---|---|---|
| | मुलें | मुली | मुले | मुली |
| १. शस्त्रक्रिया (स्त्रीवर वा पुरुषावर) | १५ टक्के | ३२ टक्के | ११ टक्के | १७ टक्के |
| २. नसबंदी | २। | ६ | २ | ८ |
| ३. प्रसूती बंद होण्याची स्त्रीवर शस्त्रक्रिया (निर्बीजीकरण शस्त्रक्रिया) | ७ | २ | – | ४ |
| ४. इंजेक्शन | ३ | ३ | – | ११ |
| ५. गोळ्या व इतर औषधे | ६ | १० | ३ | २ |
| ६. लूप | १६ | ४ | ३। | १६ |
| ७. संयम | ५ | ३ | ४ | १ |
| ८. डॉक्टरचा वा नियमन केंद्राचा सल्ला घ्या | १५ | ९ | २५ | २० |
| ९. माहीत नाही | १२ | ३१ | २४ | ३१ |
| एकूण | १०० टक्के | १०० टक्के | १०० टक्के | १०० टक्के |

पद्धतीची माहिती देण्यात मग सोवळेपणा बाळगण्याची गरज आहे काय ? रेडिओं, टेलिव्हिजन, पोस्ट, शाळा, शिबिरे वा प्रत्यक्ष केंद्र यातील प्रचारातून या मुलांना जी काही चुकीची माहिती मिळते त्यामधून त्यांची जिज्ञासा जागृत होते. ही जिज्ञासा योग्यप्रकारे पुरी करणे हे इतर जिज्ञासेप्रमाणेच आपले काम मानावयास नको काय ? अर्थात याचे स्वरूप प्राथमिक शाळेपासून ते कॉलेजपर्यंत निरनिराळे ठेवावे लागेल हे निश्चित.


कुठल्याही देशातील लोकसंख्या बऱ्याच प्रमाणात त्या देशातील जननक्षम वयातील स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून असते. जपानमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर पुरुषांची संख्या कमी झाली. पण तरीही तेथील लोकसंख्या मात्र वाढल्याचे आढळून आले. तेव्हा स्त्रियांची लग्नाबद्दलची मते या प्रश्नावर बरीच निर्णायक ठरू शकतात. आंध्र विद्यापीठातील विद्यार्थिनींची एस्. आर्. कृष्णमूर्तींनी केलेली प्रश्नपरीक्षा महितीपूर्ण आहे. १८ ते २८ वयाच्या मुलींचा यात समावेश आहे. काही निष्कर्ष असे–

२३% मुलींना लग्न हे अपरिहार्य आवश्यक वाटत नाही. तर १२% मुलींना लग्न करावेसे वाटत नाही.

वीस ते पंचवीस वय लग्नाला सर्वात योग्य.

६५% तरुणांना आपली पत्नी वयाने लहान असावी असे वाटते. २५% तरुणांना बरोबरची चालेल.

केवळ
५ पैशांत
तुमचें कुटुंब
मर्यादित
ठेवण्याचें सामर्थ्य
तुम्हीं प्राप्त
करूं शकतां !




**निरोध वापरा**

**उत्तम प्रतीच्या रबराचें कुटुंब नियोजनासाठीं प्रतिबंधक साधन १५ पैशांत ३ सरकारी मदतीमुळें किंमत कमी**

**दोन मुलांत अंतर ठेवण्यासाठीं**

आतां मूल केव्हां होऊं द्यावयाचें तें आपल्याच हातीं आहे. निरोधामुळें मूल हवें तेव्हांच होण्याचें सामर्थ्य तुम्हीं प्राप्त करूं शकता.

**माता आणि बालक यांच्या आरोग्यासाठीं**

डॉक्टर म्हणतात कीं, बालकाच्या उत्तम वाढीसाठीं पहिलीं ३-४ वर्षे त्याच्याकडे खास लक्ष देणें जरुरीचें असतें. मूल जन्मल्यानंतर प्रकृती सुधारण्यासाठीं मातेलाहि कांहीं काळ लागतो. निरोध वापरल्यानें पुढल्या मुलाचा जन्म तुम्हीं पुढें ढकलूं शकता.

निरोध उत्तम दर्जाच्या रबराचें, पुरुषांसाठीं तयार केलेलें प्रतिबंधक साधन आहे. तें साधें-सोपें व प्रकृतिवर प्रतिकूल परिणाम न करणारें असल्यानें जगांत सर्वत्र वापरण्यांत येत आहे. निरोध सर्वत्र मिळतें.

किराणा, औषधें व पान-विडीच्या वगैरे दुकानांतहि तें विकत मिळतें.

davp 70/67

८५ %० मुलींना 'हम दो हमारे दो वा दो या तीन बच्चे' मान्य आहे. ५%० मुलींचा मात्र विरोध आहे. मान्य असणाऱ्यांपैकी ३३%० मुलींना एक मुलगा व मुलगी हवी. २५%० दोन मुले व एक मुलगी तर ३२%० ना दोन मुले व दोन मुली हव्या आहेत. पण राष्ट्रीय योजनेला हातभार लावण्यासाठी उदारपणे ती संख्या तीन ठेवावयास त्यांची तयारी आहे. संततिनियमनाने कुटुंबाचा मर्यादित होणारा आकार, सुखी व समृद्ध जीवनासाठी त्यांना आवश्यक वाटतो.

भारताचे क्षेत्रफळ एकूण जगाच्या २·४ टक्के आहे. उत्पन्न १·५ टक्के आहे आणि लोकसंख्या १४ टक्के आहे. या लढाईसाठी १९५७ साली महाराष्ट्रातून या मोहिमेची सुरुवात झाली. १९६७ सालापासून त्याला गती मिळाली. मागील दहा वर्षात झाल्या त्याच्यापेक्षा अधिक शस्त्रक्रिया ६७-६८ या एका वर्षात झाल्या. दरवर्षी हे प्रमाण वाढते आहे. महाराष्ट्राने आतापर्यंत पाच वेळा राष्ट्रीय पारितोषिक मिळवले आहे.

—पण गरज अजून खूप मोठी आहे. काही पिसांनी कुठे संपूर्ण मोर होत नाही.

दक्षिणेतील काही जिल्ह्यांतुन श्री. इनबराज व श्री. राव यांना, आम्ही आमचे कुटुंब मर्यादित ठेवू शकत नाही याची मिळालेली कारणे काही प्रमाणात प्रातिनिधीक समजावयास हरकत नाही.

| कारण | मुलाखती घेतलेले लोक | ग्रामीण पुरुष १०३ टक्के | ग्रामीण स्त्रिया ३२४ टक्के | शहरी पुरुष २६९ टक्के | शहरी स्त्रिया ३०० टक्के |
|---|---|---|---|---|---|
| देवाची इच्छा | टक्केवारी | ३५ | २६.२ | ७·४ | १७·३ |
| त्याला काय ईलाज ? | | | | | |
| शक्य होत नाही | | ४५·६ | ६२·८ | ७६ | ७३·३ |
| इतर कारणे | | ७·८ | ९·१ | ७·१ | ७·३ |
| माहीत नाही | | ११·६ | १·८ | ८·६ | १·७ |
| एकूण | | १०० | १०० | १०० | १०० |

समृद्धीची दारे ठोठावण्यासाठी जर संततिनियमन आवश्यक असेल तर त्यासाठी शक्य त्या सर्व मार्गांनी समाजप्रबोधन, वैचारिक आंदोलन व प्रत्यक्ष आचरण ही आजच्या युगाची गरज आहे. गैरसमज दूर होऊन निकोप दृष्टी वाढीला लागणे हा आजचा युगधर्म आहे.

—धर्माबद्दल आदर बाळगणारा भारत देश, समाजातील सर्व पातळ्यांवर आणि सर्व थरात व वयात ह्या वैज्ञानिक धर्माची बीजे रोवली जातील यासाठी, योग्य त्या प्रकारे प्रयत्न करणार का, हे एक राष्ट्रीय आव्हान आहे.

— डॉ. नरेंद्र दाभोळकर

# रशियन लोकनृत्ये

बेरीओस्का या रशियन लोकनृत्य-पथकाचा रशियन नॅशनल ऑर्केस्ट्रॉच्या संगतीत सॅल्व्हीक लोकनृत्याचा बहारदार कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिरात झाला. रशियन संस्कृतीच्या वैशिष्टयपूर्ण जीवनाचे दर्शन या लोकनृत्यातून पुणेकरांना झाले. रशियातील विविध प्रजासत्ताकांच्या वैशिष्टयांचा आणि संस्कृतीच्या अभ्यासाने बेरिओस्का संस्थेच्या मॅडम-नात्झीडा नात्सीझाडिना या संचालिकेने या सर्व लोकनृत्यांचे संगीताच्या पार्श्वभूमीवर नूतनीकरण, संकलन व दिग्दर्शन केले आहे. बेरिओस्का कलापथकाने जगभर रशियन लोकनृत्याचे कार्यक्रम केले असून न्यूयॉर्क, लंडन, रोम, बर्लिन, पॅरीस, सिंगापूर येथे झालेल्या त्यांच्या कार्यक्रमाचे सहर्ष स्वागत झाले. ‘ज्या देशात संगीत व नृत्यावर प्रेम केले जाते त्या माझ्या देशाच्या पवित्र हृदयाचे बेरिओस्का हे पोर्ट्रेट आहे, असे मॅडम नात्झीडा म्हणतात. बेरिओस्का कलापथकाने पोलादी पडद्याआडच्या या रशियन संस्कृतीच्या कलात्मकतेचे दर्शन घडवले असून कम्युनिस्ट देशाची एक वेगळीच ओळख ही नृत्ये बघून होते. संगीत नियोजन, नर्तक, नर्तकी व गायक यामध्ये कमालीने साहचर्य असल्याने संगीताच्या स्वरातून, गायकाच्या सुरातून व नर्तकांच्या नृत्यातून एकच भाव प्रेक्षकांपर्यंत पोहचवला जातो. या लोकनृत्यातील आनंद, दुःख, प्रेम हे मानवी विचार भाषा न कळणाऱ्या प्रेक्षकांनासुद्धा नृत्यकथेतील भावनांशी समरस व्हायला लावतात. या पथकात ४० कुशल नर्तकी व १५ नर्तक असून ते सर्व बोलशोई स्कूलचे पदवीधर आहेत. सोनेरी केस, बोलके निळे डोळे व अतिशय लवणारे शरीर हे सर्वांचे वैशिष्टय! लोकनृत्यातील विषय रशियाच्या सामाजिक जीवनाशी निगडीत आहेत. हिमवर्षाव, वसंतऋतूचे स्वागत, नदीवरचे होडीनृत्य अशी निसर्गविषयक कथानृत्ये यात आहेत. तसेच विवाहप्रसंगी होणारी तरुण-तरुणींची नृत्ये, तरुणांचे प्रणयाराधन, प्रेयसीचे स्वप्न, अस्वलाची शिकार, हंसनृत्य, तारुण्य अशा मानवी भावना-विचारांभोवती ही नृत्ये गुंफली आहेत. स्त्रीनर्तकींमधील भावुकता, नाजुकता व पुरुष नर्तकांतील उत्साह, जोश हे भावविशेष त्यांच्या बोलक्या हालचालींतून जाणवतात.

बेरीओस्काच्या पहिल्या नृत्यनाटयात पावित्र्य, नम्रता, सौंदर्य असलेल्या रशियन तरुणीचे स्वप्नचित्र रेखाटले असून नर्तकीच्या हातातील बर्चवृक्षाची कोवळी फांदी हे सूर्यप्रकाश, पावित्र्य व जीवनाचे प्रतीक आहे. रशियन युवतीच्या सौंदर्याचे, स्वप्नाचे व पावित्र्याचे प्रतीक म्हणजे हे नृत्य असे मॅडम नात्झीडा म्हणतात. ‘स्प्रिंग राउंड डान्स’मध्ये हिरवे पायघोळ व चमकदार फ्रॉक्स् घातलेल्या, गुलाबी रंगाचे मोठे ‘बो’ बांधलेल्या व सोनेरी केसांच्या दोन वेण्या पुढे छातीवर घेतलेल्या

तरुणी हातात गुलाबी फुलांचे विणलेले कडे घेऊन वसंतऋतूचे स्वागत करतात. तऱ्हेतऱ्हेच्या कलात्मक हलचालींतून वसंताचे आगमन सूचित करतात. पिसासारखी हलकी चाल, तरल भावाविष्कार, लवणारी शरीरे व कलात्मक हालचाली हे यांचे वैशिष्ट्य. 'गर्ल्स लिरिकल डान्स' या लोकनृत्यातून मणिपुरी वेषाप्रमाणे पोषाख केलेल्या तरुणी, प्रियकराबरचे प्रेम, प्रतिसाद त्याला कळत नाही हे दुःख व त्याला हे कसे सांगणार अशा स्वरूपाचे भावदर्शन घडवतात. जोकर्स हे पुरुष नर्तकांचे नृत्य तरुण मनातील विचार, भावना तारुण्यातील जोश, रंगेलपणा सांगते. द फ्ली हे पारंपारिक नृत्य असून डॉन नदीवर लाटांबरोबर झुलणाऱ्या होडीची कथा त्यात सांगितली आहे. नृत्यातील हलचालीतील डुलणाऱ्या झुलणाऱ्या होडीचा, लाटांचा अभिनय इतका जिवंत वाटतो की, प्रेक्षकांना आपणही या होडीत बसून लाटांबरोबर झुलतो आहोत असा भास होऊ लागतो. 'दि बॅचलर्स' हे युद्धावर गेलेल्या रंगेल, उत्साही तरुणांचे स्वप्न सांगणारे नृत्य आहे. हे तरुण आपल्या प्रेयसीचे स्वप्न पाहतात, पत्नीचे चित्र मनात रेखाटतात, 'मी जर गावी असतो तर माझ्या प्रेयसीला मागणी घातली असती, तिच्याबरोबर हिमावर फिरलो असतो. सुंदर पदार्थ तिने मला खायला घातले असते...बर्फाळ हवेत, घरटयातील उबेत शेकोटीजवळ बसून उद्याची स्वप्ने रंगवली असतील....पण पुन्हा हेच तरुण पुढे म्हणतात, 'आहे हे काय वाईट आहे? आम्ही मजेत आहोत...आनंदात आहोत...पायांनी धरलेला जोशयुक्त ठेका, तालबद्ध टाळचा, शारीरिक कसरती यामुळे हे तरुणांचे नृत्य वैशिष्टचपूर्ण वाटले. 'सैबेरियन सूट' हे शिकारनृत्य आहे. अस्वलाची शिकार व विजयोत्सव हे याचे विषय. रशियन खेडयाचे जिवंत दर्शन या नृत्यनाटयाने झाले. 'टॅपींग डान्स'मध्ये तरुणांनी प्रेयसीचे प्रेम मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न दाखवले असून मनधरणी, खटपटी आणि खोटा रुसवा सोडून शेवटी वश झालेल्या त्यांच्या मैत्रिणी, असे हे मिस्कील भावनृत्य सर्वांना आवडले. तालबद्ध हालचाली, मुद्राभिनय, टाळचा यातून ही सर्व नृत्ये बोलकी झाली.

मॅडम नात्झीडा यांना इतर देशांच्या लोकनृत्यांचा समावेश तुम्ही यात करणार आहात का, असा प्रश्न विचारल्यावर त्या म्हणाल्या, 'माझ्या देशातील संस्कृतिक ठेव्याचे जतन व्हावे, कौतुक व्हावे असे मला वाटते. माझ्या पथकातील नृत्ये, संगीत, भाषा व कलावंत हे सर्व सॅल्व्हीक वैशिष्टयांनी परिपूर्ण आहेत. त्यात सरमिसळ व्हावी असे मला वाटत नाही. आपल्या देशाच्या सांस्कृतिक कलात्मकतेचे जतन व्हावे ही त्यांची भावना कौतुकास्पद आहे.. रशियाचे सर्वतोपरीने अनुकरण करणाऱ्या आमच्या राज्यकर्त्यांना ही भावना सुद्धा अनुकरणीय वाटेल का?

आमच्या गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीपुढे बेशिस्त व पाश्चात्यांचे विकृत अनुकरण असणारी रंभा-सभा नृत्ये व्हावीत हा विरोधाभास या पार्श्वभूमीवर दुःखद वाटतो.

—सुचित्रा राजूरकर

पंडित वि. म. जोशी

ज्योतिष विशारद

२६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९७०

# अंदाज

**मेष :** शनिवारी घरात काहीतरी शुभ समारंभ होईल. धनस्थिती समाधानकारक राहण्याचा योग आहे. उद्योगधंदा चांगला चालेल. प्रसाधनाचे व्यापारी, कलाकार, नाटय – व्यवसायातील लोकांना प्रगतीकारक दिवस आहेत. रविवार – सोमवार मित्रांकडून सर्वतऱ्हेची मदत होईल. सरकारी कामात यशःप्राप्ती होईल.

विद्याभ्यासात अडथळे येण्याचा बराच संभव आहे. याचा अनुभव सोमवार – मंगळवारी जास्त येईल. संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. उष्णतेच्या विकारांनी आजारी होण्याचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते मिश्रफलदायी आहे. रविवार – सोमवारी अचानक धनलाभ होईल. बरेच दिवस येणे असलेली रक्कम हातात पडेल. स्वभावात चिडखोरपणा अधिकच येईल. तो आवरावा. शुभ तारखा २६।२७।२८।२.

**वृषभ :** शनिवारी सार्वजनिक कामाकरता प्रवास होईल. त्यात फायदा होईल. संततीकरता बराच पैसा खर्चावा लागेल. मुलगा आजारी पडण्याचा संभव आहे. वृद्ध माणसे आयत्यावेळी मदत करतील. उद्योगधंद्यात थोडेसे मंदीचे वातावरण निर्माण होईल. ४२ वर्षांवरील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल.

गुरु-शुक्र अचानक धनलाभ घडवून आणतील. शत्रूंचा विरोध नाहीसा होईल. ही इंडिकेटची राशी आहे. मित्रांकडून सर्व व्यवहारात मदत होईल. सहकारी मना॰ प्रमाणे वागतील. पत्नीकडून चांगलेच सहकार्य मिळेल. एखादा नवीन एजन्सीचा व्यवसाय सुरू करण्याला दिवस चांगले आहेत.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या घरातून आहे. ते शुभ फलदायी आहे. सोमवार – मंगळवार घराची कामे उपस्थित होतील. त्यात शेवटी यश प्राप्त होईल. अमावास्येला (ता. ३० ला) सरकारी कामात भरघोस यशःप्राप्ती होईल. शुक्रवारी लॉटरीचे तिकिट घेण्याला दिवस चांगला आहे. शुभ ता. २६।२८।२९।२.

**मिथुन :** रविवार – सोमवार अत्यंत धनदायक दिवस आहेत. घरासंबंधीच्या अगर जमिनीच्या व्यवहारात बराच धनलाभ होईल. सरकारकडून रक्कम येणे असल्यास ती हातात पडेल. ४२ च्या पुढील व्यक्तींना सर्व बाजूंनी भाग्योदय होईल. वडील भाऊ-बहीण आजारी पडतील. विद्याभ्यासात प्रगती चांगली होईल. संततीचा उत्कर्ष होईल. एखाद्या कॉंपीटेटिव्ह परीक्षेला बसणाऱ्या अगर मिलिटरी

नोकरीत असलेल्या मुलाला प्रगतीदायक योग आहेत. लेखक, प्रकाशक, चित्रकलाकार यांना फारच चांगले दिवस आहेत. धार्मिक प्रचारकाला दिवस चांगले आहेत.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे, पराक्रम, पैसा, सुख, विद्याभ्यास, संततीचा उत्कर्ष असे सर्व शुभ योग आहेत. फक्त या सर्व गोष्टी खाजगी आयुष्यात घडतील. राशी devalued गटाची असल्यामुळे सार्वजनिक चळवळीत अपयश येईल. त्यात भाग घेऊ नये. सर्व आठवडा शुभ आहे.

कर्क : आठवड्याच्या सुरुवातीपासूनच घरात शुभ कार्याची तयारी चालू होईल. अनेक बाजूंनी पैसा हातात येण्याचा योग आहे. ता. २ ला नातलगांसह अत्यंत आनंदात दिवस जाईल. प्रवासाचा योग येईल. त्यात चांगलाच फायदा होईल.

विद्याभ्यासात थोडासा अडथळा येईल. व्यापार उद्योग चांगला चालेल. भागीदार व पत्नी यांचेकडून संपूर्ण सहाय्य मिळेल. शत्रूनाश होईल. मित्र-मंडळीकडून सर्व तऱ्हेची मदत मिळेल. पाठीवरील भावंडे आजारी पडण्याचा संभव जास्त आहे.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. ता. ३०।१ ला पराक्रम करण्याला चांगली संधी मिळेल. सिंडिकेट गटाची राशी आहे. नवीन उपक्रम केल्यास त्यात यशःप्राप्ती निश्चित होईल. घराबद्दल अडलेली कामे मार्गस्थ होतील. सासुरवाडची मंडळी येऊन दिवस आनंदात घालवतील. शुभ तारखा २६।३० आणि १।२.

सिंह : रविवार–सोमवार शारीरिक श्रमामुळे थोडासा त्रास होण्याचा बराचसा संभव आहे. बुध–रवीचा अन्योन्य योग चांगलाच धनलाभ घडवून आणील. सरकारातून येणे असलेला पैसा हातात पडेल. संततीकडून सर्व तऱ्हेची आर्थिक मदत होईल. आठवड्याच्या शेवटी धार्मिक कार्याकरता तीर्थयात्रेला जाण्याचा शुभयोग आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण प्रगती होईल. कलाकारांना पुढे येण्याची संधी निश्चित मिळेल. साहित्य व कला यांच्याशी संबंध असलेल्या सर्व व्यावसायिकांना जनतेकडून आणि सरकारकडूनही प्रोत्साहन मिळेल.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे. ते मिश्रफल देणारे आहे. धनस्थानात अमावास्या होते आहे. पण ते दिवस सट्टा-लॉटरी अगर अन्य मार्गांनी पैसा मिळण्याला चांगले आहेत. ३।६।९ या आकड्यांनी बनलेले तिकिट घेतल्यास फायदा होईल. शुभ तारखा २६।३०।१।२.

कन्या : आठवड्याच्या सुरुवातीपासूनच आरोग्य बिघडण्याला सुरुवात होण्याचा योग आहे. मधुमेहासारखे रोग वाढतील. मानसिक चिंता तीव्र भासेल. व्यवसाय–धंद्याबद्दल काळजी उत्पन्न होईल. सरकारी लायसेन्सवाल्यांना हा अनुभव जास्त येईल.

उद्योगधंद्यात बऱ्याच उलाढाली होतील. प्रत्येक बाबतीत जपून पाऊल टाकावे सरकारी कामात मिळते जुळते घेण्याचा प्रयत्न करावा. कोणत्याही बाबतीत आग्रह धरू नये. बौद्धिक व्यवसाय करणारांनी शिस्तीची माघार तात्पुरती घ्यावी. सप्ताहाच्या शेवटी परिस्थिती पुष्कळच सुधारेल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे. ते साधारणच आहे. एकच योग उत्तम आहे. सहाव्या घरातील राहू व धनस्थानातील गुरु–शुक्र अगदी आयत्यावेळी परिस्थितीवर मात करतील. आर्थिक परिस्थिती सावरून धरतील. शुभ तारखा २६।३०।१।२.

तूळ: सप्ताहाच्या सुरुवातीलाच यशाची सुरुवात आहे. सार्वजनिक कामात यशस्वी होता येईल. द्रव्यलाभ भरपूर होईल. राजकीय पुढाऱ्यांना मानमान्यता मिळेल. प्रतिपक्षांचा विरोध मोडला जाईल. विद्याभ्यासात थोडीशी माघार घ्यावी लागेल. संततीकरता एखाद्या कामात मनाविरुद्ध पडावे लागेल.

सबंध आठवडा धावपळीत जाईल. सुखहानी होईल. इंडिकेट गटाची राशी आहे. तुळशीदास–रघुनाथरावांच्या जोडीला अपयश येणार नाही. सांसारिक सुख व समाधान कमी होईल.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या घरातून आहे ते फारच चांगले आहे. सबंध आठवडा शुभ फलदायी आहे.

वृश्चिक: या आठवड्यात द्रव्याची अडचण फार भासेल. संततीवर व घरातच खर्च फार होईल. पत्नी आजारी पडण्याचा बराच संभव आहे. भागिदार नुकसानीत आणतील. फक्त सरकारी कामे घेणारांना नुकसान पोचणार नाही.

विद्याव्यासंगी माणसांची कुचंबणा होईल. वातविकारांनी आजारी होण्याचा दाट संभव आहे. त्याच्या निवारणार्थ १०८ गायत्री जप रोज करावा. सार्वजनिक कामात मानमान्यता प्राप्त होईल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे. ते मिश्र फल देणार आहे. शनिवारी धार्मिक कामाकरता प्रवास घडण्याचा योग आहे. रविवार–सोमवारी अडथळे आले तरी धनप्राप्ती बरी होईल. शुभ तारखा २६।२७।२८।२.

धन: या आठवड्यात धनलाभ, भाग्योदय व मानमान्यता प्राप्त होईल. भाग्येश, दशमेश व एकादशेश अन्योन्य योगात आहेत. ते फार चांगले आहेत. धार्मिक वृत्ती वाढेल. मित्रमंडळींकडून प्रत्येक बाबतीत संपूर्ण सहकार्य मिळेल.

पाठच्या भावंडाशी तीव्र मतभेद होईल. शास्त्रीय अभ्यास करणारांना यश:प्राप्ती होईल. कलाकारांना, सरकारी अधिकाऱ्यांचा व लोकांचा चांगलाच पाठिंबा मिळेल. विवाहाची बोलणी यशस्वी होण्याला थोडा अवकाश आहे. अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. रविवार-सोमवारी

भाग्योदय करणाऱ्या गोष्टी घडतील. पण मानसिक शांतता बिघडण्याचा संभव आहे. २ तारखेला लॉटरीचे तिकिट घ्यावे. सर्व आठवडा शुभफलदायी आहे.

मकर : या आठवड्यात खर्चाची व मिळकतीची जेमतेम तोंडमिळवणी होईल. धंदा–व्यवसाय ठीक चालेल. सार्वजनिक कामात भरघोस यश मिळेल. सरकारी पाठिंबा मिळेल. घराच्या अगर स्थावराच्या व्यवहारात थोड्याशा अडचणी येतील. पण शेवटी चांगलाच फायदा होईल. हा योग रविवार–सोमवारी येईल.

विद्याभ्यासात चांगलेच यश येईल. विद्येमुळे मान-मान्यता मिळेल. लिखाणाला प्रसिद्धी मिळेल. संततीचा उत्कर्ष व अचानक धनलाभ होईल. उद्धट वागण्याने सुख-नाश होतो, तरी जरा संयमानेच वागावे. दररोज ' नमः शिवाय 'चा १२८ जप करावा. मित्रमंडळींकडून अपेक्षाभंग. चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातुन आहे. ते मिश्रफल-दायी आहे. शनिवारी गृहस्वास्थ चांगले राहील. पत्नी काही तरी शुभ संभारंभाचे आयोजन करील. सर्व आठवडाच शुभ आहे.

कुंभ : शनिवारी पाहुण्यांमुळे दिवस आनंदात जाईल. रविवारी – सोमवारी मान-सिक स्वास्थ्य बिघडेल. पण व्यापारात सर्व बाजूंनी प्रगती होऊन धनलाभ चांगलाच होईल. पत्नी व सहकाऱ्यांकडून सर्व प्रकारची आर्थिक, शारीरिक श्रमाची मदत होईल. बिल्डिंगचे काम करणारांना दिवस चांगले आहेत.

विद्याभ्यासात यश मिळेल. टेक्निकल विषयांचा अभ्यास करणारांना फारच चांगले दिवस आहेत. अपेक्षेपेक्षाही जास्त यशःप्राप्ती होईल. संततीचा भाग्योदय २७ ते ३२ या वयाच्या व्यक्तींचा प्रेमविवाह होण्याचा दाट संभव आहे.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या घरातून आहे. ते चांगलेच आहे. चंद्र – रवीना ६।८।१२ या स्थानांचा दोष नसतो. शिवाय चंद्र सहाव्या घराचा अधिपती अष्टमात आहे. अमावास्येला पत्नीला आजारीपण संभवते. शुभ तारखा २६।२७।२८ व २.

मीन : शनिवारी मुलाकडून शुभ संदेश येईल. विपरीत धनस्थितीमुळे त्रस्त व्हाल. येणारा पैसा हातात पडण्याला विलंब लागेल. नेत्राचे विकार बळावतील. मानसिक त्रास असह्य होईल.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होण्याला अनेक अडचणी येतील. शत्रू प्रबळ होईल. कोणतीही गोष्ट मनासारखी होणे स्वाधीनचे नाही. मित्रांकडून थोडी फार मदत होईल. व्यवसायात मंदी निर्माण होईल. आत्मघातकी विचारांपासून दूर रहा.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे. ते मिश्रफलदायी आहे. अचानक धन-लाभ होईल. लॉटरीचे तिकिट घेण्याला ता. २ चांगली आहे. मानहानी होण्याचा जास्त संभव आहे. त्यावर उपाय दर शुक्रवारी गजांतलक्ष्मीच्या चित्राला हार घालावा. शुभ तारखा २६।२९।३०।२.

□ □ □

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

पृष्ठ १२ वरून

श्री. पिंगळे व श्री. जोगळेकर यांच्या बहुतेक प्रश्नांबाबतची प्रतिक्रिया जवळ जवळ सारखी असल्यानं ती एकत्र देणं योग्य ठरेल.

हिंदूंचा विचार हा जातीयवादी ठरतो असं गृहीत धरलं जातं, पण हिंदुधर्म इतरांवर प्रेमच करायला शिकवतो. द्वेष नव्हे. हिंदूंचं संघटन होणं आवश्यक आहे. याचवेळी मुसलमानांना शिव्या देणं किंवा कोणत्यातरी गोष्टीची इंग्रजांवर जबाबदारी टाकणं याने हिंदूंचे प्रश्न सुटणार नाहीत. ते हिंदूंनीच सोडवायला पाहिजेत. निस्वार्थी सेवा, अखिल भारताचा विचार हे फार महत्वाचं. आज हिंदू पिढ्यान् पिढ्या एकत्र आले नाहीत. त्यांच्यावर आवश्यक ते संस्कार शाखेद्वारे करण्याचा प्रयत्न संघ करीत असतो.

एखाद्या संघटनेवर बंदी घालणं लोकशाहीत अयोग्यच, बंदीमुळे अशाच गोष्टीकडे माणूस झुकत असतो.

'संघ अनेकांना मिळमिळीत वाटतो तर अनेकांना तो हुकूमशाही प्रवृत्तीचा वाटतो. मिळमिळीत असेल तर– 'विल डाय इटस् ओन डेथ' इतरांनी त्याची काळजी का करावी ? पण हा तसा प्रकार नसून संघाची वाढती शक्ती इतरांच्या डोळ्यात सलते.' श्री. पिंगळे.

'संघावर निष्क्रियतेचा शिक्का मारला जातो पण मनोवृत्ती तयार करणे व ती मनोवृत्ती व्यक्ती व्यक्तीत–एकदा का तयार होऊ लागली की समाजाची मनोवृत्ती तयार होते. ही वृत्ती संघ तयार करीत आहे. तेव्हा ही निष्क्रियता कशी काय ? आम्हाला संघात हे तयार करायचं आहे. बाहेर आमचे स्वयंसेवक त्यांना करता येणारी कामे करतातच, पण संघाचं लेबल लावून काम करणं आम्हाला आवडत नाही.'–इति श्री. जोगळेकर.

संस्कारावर भर देऊन हळूहळू विचार तयार करणं हाच एकमेव मार्ग संघ अवलंबू इच्छितो.

इतरांना संघात प्रवेश देण्याबाबत त्यांचं म्हणणं, की जे स्वतःला परके समजतात त्यांना कसं सामावून घ्यायचं ? या देशात अनेक परके आले, त्यांनी येथील लोकांत त्यांना सामावून घेतलं तसं ही मंडळी करीत नाहीत. स्थिर मनोवृत्ती तयार करणं कठीण. प्रासंगिक मनोवृत्ती लगेच तयार होते. संघ व शिवसेना यामधला फरक हाच आहे. या सर्व गोष्टींवरून संघाचं स्वरूप आम्ही स्पष्ट केलं आहे असं त्यांनी मला सांगितलं.

— विजय वैद्य

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

# अग्निपुत्र

वसन्त पोतदार

प्रसिद्धीकाल : १९७० अखेर

प्रसिद्धीकाल : १९७१ मध्य

रा. म. शास्त्री

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

राजहंस प्रकाशन